सकाळ

पुणे, शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ ■ पाने १२ किंमत ₹ ६

NIE NEWSPAPER IN EDUCATION


मित्र-मैत्रिणींनों, चंद्र, चांदोबा, चंदामामाशी आपले जवळचे नाते आहे. लहानपणापासून आपल्या गाण्यांत आणि गोष्टींत चंद्र असतो. तुमच्यापैकी काही जणांना मोठेपणी अंतराळवीर होऊन चंद्रावर जावेसेही वाटत असेल. पण कल्पना करा, जर पृथ्वीला दोन-दोन चंद्र असते तर?... अशक्य वाटणारी ही घटना घडणार आहे २९ सप्टेंबर ते २५ नोव्हेंबर यादरम्यान. या कालावधीत पृथ्वीला एक 'मिनी मून' मिळणार आहे. चला तर मग, आज जाणून घेऊया या विशेष खगोलीय घटनेविषयी...

# पृथ्वीला मिळणार दोन चंद्र!



## काय आहे 'मिनी मून'

या नवीन चंद्राचे- 'मिनी मून'चे शास्त्रीय नाव आहे '2024 PT5'. हा एक 'अॅस्ट्रॉइड' आहे. जसा चंद्र हा पृथ्वीचा नैसर्गिक उपग्रह आहे, तसे 'अॅस्ट्रॉइड' हे सूर्याभोवती फिरणारे लघुग्रह असतात. आता आपण चंद्र आणि '2024 PT5' मिनी मूनची तुलना करून बघूया. हा 'मिनी मून' चंद्रापेक्षा खूपच छोटा आहे. त्याचा व्यास आहे केवळ १० ते ११ मीटर, तर चंद्राचा व्यास आहे ३४७४.८ किलोमीटर- म्हणजे ३४,७४,८०० मीटर. 'मिनी मून' चंद्रापेक्षा किती पिटुकला आहे, लक्षात आलं का? तो इतका छोटा असल्याने मराठीत आपण त्याला 'लघुग्रह' न म्हणता 'अशनी' म्हणून शकतो. हा 'मिनी मून' अंतराळातील 'अर्जुन अॅस्ट्रॉइड' लघुग्रहसमूहापैकी आहे. अर्जुन समूहातील लघुग्रहांची सूर्याभोवती फिरण्याची कक्षा पृथ्वीच्या कक्षेसारखीच आहे. 'मिनी मून' पृथ्वीभोवती एक संपूर्ण प्रदक्षिणासुद्धा करणार नाहीये. पृथ्वीच्या कक्षेत ५३ दिवसांचा प्रवास करून 'मिनी मून' आपल्या लघुग्रहसमूहात परत जाईल- म्हणजेच सूर्याभोवती प्रदक्षिणा करू लागेल.

## ही दुर्मीळ घटना आहे का?

'2024 PT5' मिनी मून ही खगोलीयदृष्ट्या विशेष घटना आहे खरी, पण ती दुर्मीळ म्हणता येणार नाही. पृथ्वीला 'मिनी मून' मिळण्याची ही काही पहिलीच वेळ नाहीये. गुरुत्वाकर्षणाद्वारे अवकाशातील 'निअर अर्थ ऑब्जेक्ट्स'ना (NEO) आपल्या कक्षेत खेचण्याची क्षमता पृथ्वीकडे आहे. असाच हा आताचा 'मिनी मून' आहे. 'मिनी मून' घटना दोन प्रकारच्या असतात. दीर्घकाळ टिकणाऱ्या आणि अल्पकाळासाठीच्या. दीर्घ कालावधीचे 'मिनी मून' पृथ्वीभोवती एक किंवा अधिक प्रदक्षिणा पूर्ण करतात. त्यासाठी ते एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक वेळ घेतात.

अल्प कालावधीचे 'मिनी मून' पृथ्वीभोवती प्रदक्षिणा पूर्ण करत नाहीत. त्यापूर्वीच- म्हणजे काही दिवस, काही आठवडे वा काही महिन्यांतच पृथ्वीची कक्षा सोडून बाहेर जातात. '2024 PT5' मिनी मून यातल्या दुसऱ्या प्रकारचा आहे, हे तुमच्या लक्षात आलेच असेल.

यापूर्वीचे एक उदाहरण द्यायचे, तर '2022 NX1' हा अल्प कालावधीचा 'मिनी मून' पृथ्वीच्या कक्षेत १९८१ आणि २०२२ या दोन्ही वर्षी आला होता. मजा म्हणजे तो २०५१ मध्ये तो पुन्हा अल्प कालावधीसाठी पृथ्वीचा 'मिनी मून' होईल.

दीर्घ कालावधीचे एक उदाहरण म्हणजे '2006 RH120'. या छोटुकल्या अशनीने २००६-०७ मध्ये पृथ्वीभोवती प्रदक्षिणा पूर्ण केली होती.

**'मिनी मून' आपल्याला बघता येईल का? :** पृथ्वीला दोन चंद्र मिळणार, हे वाचून कदाचित तुमच्या मनात आकाशात एकाच वेळी दोन-दोन चंद्र दिसणार, अशी प्रतिमा उभी राहिली असेल. इथे मात्र आपली निराशा होणार आहे! कारण '2024 PT5' मिनी मून नुसत्या डोळ्यांनी दिसणार नाहीये. हा अशनी इतका धूसर असणार आहे, की तो पाहण्यासाठी साधी दुर्बीणही पुरणार नाही. व्यावसायिक पद्धतीची मोठी- ३० इंची दुर्बीण वापरणाऱ्या प्रगत वेधशाळाच तो बघू शकतील. जो 'मिनी मून' आपण सहजासहजी बघूच शकणार नाही आहोत त्याचे एवढे काय कौतुक, असे वाटले असेल ना? पण 'मिनी मून' लहान असले, तरी त्यांचा अभ्यास महत्त्वाचा असतो. लघुग्रह व अशनींबाबत पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण कसे काम करते? लघुग्रहांचे वर्तन कसे असते? याची उत्तरे त्यातून मिळू शकतात.

# बैल पोळा

आला आला पोळा
गावात होती बैल गोळा

रंगीत झुली, रंगीत शिंगे
बैलांना बांधली बाशिंगे

बैल सारे सजले, धजले
गावात मस्त फिरू लागले

चौकांत ताशा, ढोल वाजले
बैल उत्साहात नाचू लागले

वाजती गळ्यात घुंगरांच्या माळा
ऐसा चाले बैल पोळा

ढोल ताशांचा आवाज गावात घुमला
चमकदार झुल घालून आमचा बैल सजला

पोळ्याचा सण करू आनंदाने साजरा
हीच आहे आमची मनापासून इच्छा

**- शुभांगी शिंदे,** सहावी
जि. प. प्राथमिक शाळा, सुलतानवाडी
ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर



# चला, निसर्गमेळ्याचे रंग लुटूया!



निसर्ग हा लहान मुलांच्या जिव्हाळ्याच्या विषय. विविधरंगी फुलपाखरांच्या मागे धावण्यात वेळ घालवणे, एखाद्या पक्ष्याच्या आवाजाची नक्कल करण्याचा प्रयत्न करणे, डोंगर सर करणे, भर उन्हात जंगलात हुंदडणे, पावसात चिंब भिजणे यात मुलांना निराळाच आनंद मिळतो. कार्टून्समधील मुलांच्या आवडत्या अनेक व्यक्तिरेखा जंगलाच्या कथेवरच आधारित असतात. मग ती जंगल बुकमधली मोगलीची गोष्ट असो किंवा लायन किंगमधल्या सिंबाची. अशाच निसर्गाच्या विविध पैलूंचे दर्शन घडवणाऱ्या सोव्हिनीयर वस्तूंचे, खेळांचे प्रदर्शन बघायला मिळाले, तर किती मजा येईल ना!

निसर्गातल्या प्राणी-पक्ष्यांची चित्रण असणारे विविधरंगी टी-शर्ट्स आणि इतर वस्तू, निसर्गावर आधारित खेळ, पुस्तके, डायरी, कापडी बॅग्ज वगैरे वस्तू बघताही येतील आणि आपल्या संग्रही ठेवण्यासाठी घेताही येतील अशा आगळ्या-वेगळ्या 'वाईल्ड लाइफ मेळ्याचे' आयोजन पुण्यात नेचर वॉक चॅरिटेबल ट्रस्ट या निसर्गसंस्थेने गोल्डन लीफ बँक्वेट हॉल आणि शुभारंभ लॉन्सच्या संयुक्त विद्यमाने २ ऑक्टोबर व ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केले आहे. पुण्यातील म्हात्रे पुलाजवळील डी.पी. रस्ता येथील शुभारंभ लॉन्स येथे सायं. ४ ते रात्री १० वा. या वेळेत या मेळ्याचा आनंद बाळगोपाळांना लुटता येणार आहे. 'सकाळ' या मेळ्याचे माध्यम प्रायोजक आहे.



याशिवाय विविध जंगलांत राहणाऱ्या स्थानिक आदिवासी लोकांनी केलेल्या कलात्मक वस्तूंचे प्रदर्शनही मुलांना बघता येईल. निसर्ग म्हणजे काय? त्यात कोणते घटक असतात? निसर्ग का वाचवायला हवा? याची माहिती देणारे छोटे छोटे माहितीपटही मुलांना पाहता येतील.

निसर्गावर आधारित खेळ खेळता येतील. अगदी 'फेस पेंटिंग'चा आनंदही घेता येईल. याशिवाय निसर्गाला पूरक साबण वगैरे वस्तू कशा बनवायच्या? याचं प्रात्यक्षिकही पाहता येईल आणि या वस्तू बनवूनही पाहता येतील. आपल्याला वर्षभर पिण्याचे पाणी पुरवणारे स्रोत जपून ठेवणाऱ्या आणि नष्ट होत असलेल्या देवराया म्हणजे काय? देशी वृक्ष का महत्त्वाचे आहेत? हे सांगणारे एक 'देवराई' प्रदर्शनही या मेळ्यात पाहता येणार आहे.

या मेळ्यात येल्लो लिली किड्स आयोजित ॲनिमल किड्स फेअरही आहे. एक ते १२ वर्षे या वयोगटाच्या सर्व मुलांसाठी अनुभवी शिक्षकांनी बनवलेले खेळ, फॅन फेअर, हस्तकलेच्या गोष्टी, ओरिगामी, साबण-मेणबत्या बनवणे, मास्क मेकिंग, शब्दकोडी, आकड्यांचे प्राणी, लहान मुलांसाठी इनडोर प्ले एरिया असं खूप काही मुलांना अनुभवता येणार आहे.

मेळ्याला येणाऱ्या प्रत्येकाला एक देशी झाड दिले जाणार असून, त्याचे संगोपन कसे करावयाचे हेही सांगण्यात येणार आहे. हा मेळा सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. निसर्गाच्या विविध अंगांची ओळख करून घेऊन दोन दिवस निसर्गाचा मनसोक्त आस्वाद घेण्यासाठी प्रत्येकाने नक्की भेट द्या!

**- दीप्ती खरे**
मो. ७५०७३३६६३३


# उन्हाळा माझा आवडता

मला सर्व ऋतूंमध्ये उन्हाळा खूप आवडतो. उन्हाळ्यामध्ये शाळेला सुट्ट्या असतात. उन्हाळ्यात आंबा येतो आणि मला तो खूप आवडतो. या वर्षीच्या उन्हाळयात काही वेगळीच मजा आली. मी मामाच्या गावी गेलो. तेथे मी खूप धमाल केली. माझा मामा सगळ्यांना आइसक्रीम, ज्यूस घेऊन देत होता. त्यामुळे आम्हाला खूप मजा आली. आम्ही घरी टीव्हीवर काही छान चित्रपटही पाहिले. आम्ही रोज फिरायला जायचो. एके दिवशी आम्ही एका किल्ल्यावर फिरायला गेलो. तो भुईकोट किल्ला आहे. मला तो किल्ला खूप आवडला. मी फार वेळ त्या किल्ल्यात थांबलो होतो. मला जे जे आवडलं ते सगळं मी टिपून घेत होतो.

मी माझ्या घरी आलो व मित्रांना हे सर्व सांगितलं. माझे मित्रसुद्धा नुकतेच मामाकडूनच आले होते. त्यांनीसुद्धा त्यांच्या मामाच्या गावाकडे केलेली सर्व धमाल सांगितली. ओम जाधव, शंभूराजे कोल्हे, चैतन्य आसबे ही माझ्या मित्रांची नावे आहेत. आम्ही जवळच्याच महाविद्यालयात रोज क्रिकेट खेळण्यास जातो. उन्हाळ्यात संध्याकाळी थोडं ऊन कमी झालं, की आम्हाला खेळायला भरपूर वेळ मिळतो. सकाळीदेखील आम्ही थोडा वेळ खेळतो. त्यामुळे मला हा ऋतू खूप आवडतो. तेथे आलेल्या मजेमुळे मला हा निबंध लिहावासा वाटला. तुम्हीदेखील तुमच्या आवडत्या ऋतूबाबत लिहा आणि तुमच्या मित्रांनादेखील विचारा.

**- करण तिवारी,** नागेश विद्यालय, जामखेड






**भक्ती वक्ते,** आठवी
श्री संत जंगली महाराज इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, नांदुरा, बुलडाणा



**आस्था नागरे,** पाचवी
लिटिल एंजल स्कूल, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर



**रेवा लोधे,**
देवयानी इंटरनॅशनल स्कूल, सिंदेवाही, जि. चंद्रपूर

२ आंबा हे फळ कोणत्या ऋतूत येते?

४ 'मकडी' चित्रपटात दुहेरी भूमिका श्वेता बसू प्रसाद हिने केली आहे.

# जीवनाचे उद्दिष्ट काय?

**दोस्तांनो, तुम्ही सकाळी उठता, आवरून शाळेत जाता, संध्याकाळी खेळायला जाता, घरी येऊन अभ्यास करता, रात्रीच्या जेवणानंतर दिवस संपतो. झोपून उठल्यावर पुन्हा पुढचा दिवस. आपल्या सगळ्यांच्याच दिनक्रमात तोचतोचपणा असतो. अनेक मोठी माणसे 'रुटीन' कंटाळवाणे झाले असल्याची तक्रार करत असल्याचे तुम्ही पाहिलेच असेल. ती वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून आपण आपल्या जीवनाचे उद्दिष्ट ठरवायला हवे.**



## 'इकिगाई' म्हणजे काय?

'इकिगाई' या जपानी शब्दाची फोड- 'इकि- life- आयुष्य' आणि 'गाई- to be worthwhile- अर्थपूर्ण' अशी आहे. अर्थात आयुष्य अर्थपूर्णरित्या जगणे. प्रत्येकासाठी 'इकिगाई' वेगळी असू शकते, कारण प्रत्येकाची आवड वेगळी असते. सगळ्यांच्या बाबतीत त्याचा आपल्या इतर 'रुटीन'शी, अभ्यासाशी, करिअरशी संबंध असेलच असेही नाही. पण जीवनात अशी एक तरी गोष्ट हवी, जी तुम्हाला मनापासून आवडते, सातत्याने करावीशी वाटते. त्यातून तुम्हाला निरंतर आनंद मिळत राहील.

## आवड ओळखायची कशी?

समजा, तुम्हाला सकाळच्या थंड हवेत निसर्गात फिरायला आवडते. रविवारी सकाळी घराजवळच्या टेकडीवर फिरायला जायचे, हुंदडायचे, पक्षी बघायचे तुमच्या मनात आहे. प्रत्यक्षात शनिवारी रात्री तुम्हाला झोपायला उशीर झाला. टीव्हीवर तुमचा आवडता चित्रपट लागल्याने त्यात तुमचा बराच वेळ गेला. सकाळी आवरून ६ वाजायच्या आतच बाहेर पडायचा तुमचा प्लॅन आहे. साडेचारचा गजर वाजतो खरा, पण तुम्हाला अजिबात उठावेसे वाटत नाही. तुम्ही गजर बंद करून डोळ्यांवर पांघरून ओढून घेता. पण लगेच तुमच्या डोळ्यांसमोर सकाळी दिसणारे टेकडीचे लोभसवाणे रूप येते. आताच उठलो नाही, तर टेकडीवर जाता येणार नाही. पुन्हा पुढच्या सुट्टीची वाट पाहावी लागेल. हे मनात येताच तुम्ही ताड्कन उठता आणि टेकडीच्या सफरीसाठी तयार होता. आपण आणि आपली आवड यांच्या मध्ये कोणताही बहाणा येऊ शकत नसेल, तरच ती खरी आवड! त्यातूनच पुढे आपल्याला आपली 'इकिगाई' सापडू शकते.

## जीवनाला उद्दिष्ट का हवे?

आपण शाळा, कॉलेजमध्ये शिकतो, करिअर करतो, यश आणि पैसे मिळवतो, मोठेपणी कुटुंबाची जबाबदारीसुद्धा घेतो. या दरम्यान आयुष्याचे एक 'रुटिन' बसते. पण यश, पैसा आणि त्यातून येणारे समाधान एवढेच पुरेसे असते का? त्यापलीकडेही माणसाला मनाचे समाधान हवे असते. शालेय वयात हा मुद्दा कदाचित तुम्हाला समजायला कठीण वाटेल, पण ज्यात मन चांगल्या अर्थाने गुंतून राहील, समृद्ध होईल, अशी एखादी गोष्ट प्रत्येकाला गरजेची असते. मग ती एखादी कला असेल, खेळ असेल, छंद असेल किंवा एखादा निश्चय. हे उद्दिष्ट जीवनात कंटाळवाणेपणा येण्यापासून वाचवते आणि निखळ आनंद देते.

**'इकिगाई' या संकल्पनेविषयी अधिक माहिती घेण्यासाठी, त्याचे निकष समजून घेण्यासाठी 'इकिगाई फॉर टीन्स- फाईंडिंग युअर रीझन फॉर बीईंग' हे पुस्तक वाचण्याचा तुम्हाला उपयोग होईल.**

## तुमची 'इकिगाई' काय ?

वर दिलेले निकष लावून तुमची आवड काय असू शकेल, हे आधी शोधा. मग भविष्यात तुमची 'इकिगाई' काय असेल, याचा तुम्हाला अंदाज येईल. हे लक्षात ठेवा, की छंद, आवड इ. बदलत राहतात. त्यामुळे शालेय वयातच जीवनाचे उद्दिष्ट ठरवण्याची काहीही घाई नाहीये. आपल्याला आता केवळ त्या दिशेने विचार सुरू करायचा आहे.

# हिंमतबहाद्दर - भाग २

**अफाट हिंमतीवर अन् बुलंद धाडसाच्या जोरावर स्वराज्य उभ राहिलं. कोंडाजी फर्जंदने अवघे ६० मावळे सोबत घेऊन पराक्रम केला. आता ६० हजारांच्या विरोधात मावळ्यांनी कसे शौर्य गाजवले? त्याची पराक्रमगाथा पाहूया.**

■ सौरभ कर्डे



• **पार्श्वभूमी :** साल्हेरचाचा प्रचंड मोठा किल्ला मराठ्यांनी सहजपणे जिंकला. हे मुघलांना पचले नाही. औरंगजेबाने दिलेरखान आणि बहादूरखान हे दोन मोठे सरदार साल्हेर जिंकायला पाठवले. या दोघांनी प्रचंड मोठी फौज जमा केली, बलाढ्य सरदार घेतले अन् ते साल्हेरच्या दिशेने रवाना झाले. किल्ला जिंकण्यासाठी त्यांनी वेढा घातला. साठ हजार सेना साल्हेर घेण्यासाठी पसरली.

■ **महाराजांचा आदेश :** ही बातमी समजताच हा महत्वपूर्ण किल्ला जाऊ द्यायचा नाही ह्या निर्धाराने छत्रपती शिवाजी महाराजांनी सरनोबत प्रतापरावांना आदेश दिला की, 'तुम्ही व मोरोपंत दुतर्फा सालेरीवर चालून घेऊन, गनिमास मारून गर्दीस मेळवा'. असा स्पष्ट देश प्रतापरावांना आल्याबरोबर मराठी मनगटातली रग सळसळली अन् प्रतापराव निघाले. कोकणातून मोरोपंतही साल्हेरच्या रोखाने सुटले.

■ **हिंमतबुलंद योजना :** प्रतापरावांनी ठरवलं की, थेट गनिमावर चाल करायची अन् वेढा फोडायचा. आजपर्यंत डोंगरदरीत वापरलेला गनिमी कावा न वापरता खुल्या मैदानात शत्रूला भिडायचं. वा भले शाब्बास! अशी हिंमत असणारे प्रतापराव म्हणजे बेदरकार काळजाचे धनी.

■ **प्रतिघात :** जमलेल्या मावळ्यांनी प्रतापराव अन् मोरोपंतांच्या नेतृत्वाखाली थेट वेढ्यावर हल्ला चढवला. साल्हेरसाठी तुंबळ रण चालू झाले. मोरोपंतांचे पायदळ वेढा छेदत आत तंबू, राहुट्यात घुसले अन् अंगावर धावलेला शत्रू प्रतापरावाच्या घोडदळाने कापायला सुरवात केली. हा लढा आजपर्यंतच्या स्वराज्य प्रवासातला सर्वांत मोठा होता. महायुद्ध झाले. अखेरीस मराठ्यांनी साल्हेरच्या रणांगणात मुघलांचा पूर्ण पराभव केला. फत्ते झाली.

■ **यश :** या युद्धात विजयी झाल्यावर सहा हजार घोडे (शत्रूकडचे) मिळाले. सव्वाशे हत्ती, सहा हजार उंट मराठ्यांच्या बाजूला जमा जाले. मुघलांचे बावीस वजीर जिवंत धरले आणि सरदार इख्लासखान ठार मारला. वेढा उठवला. साल्हेर मुक्त केला.

■ **परिणाम :** साल्हेरच्या झालेल्या युद्धाचा सगळ्यात मोठा परिणाम म्हणजे - आपण खुल्या मैदानातही प्रचंड संखेच्या शत्रूला मारु शकतो असा बळकट आत्मविश्वास मावळ्यांना आला. मुघलांच्या काळजात भीती निर्माण झाली. प्रतापरावाच्या हिंमतीला तोड नाही. मोरोपंतांच्या धाडसाला उपमा नाही. साठ हजार शत्रूला खुल्या मैदानात पहिल्यांदाच भिडलेल्या 'हिंमतबहाद्दर' मावळ्यांना मानाचा मुजरा!

*(लेखक शिवव्याख्याते आहेत.)*

शिवसृष्टी
ASIA'S ONLY HISTORICAL THEME PARK
शिवसृष्टीत या, महाराजांचा वारसा पाहा, इतिहास, तंत्रज्ञान अन् गौरवाचा आनंद लुटा!
४६




वेळ
सोमवार ते रविवार : सकाळी ९.३० ते ६.३०

तिकीट दर
लहान मुले (वय ५ ते १५ वर्षे) : रु. ८० प्रत्येकी
मोठ्या व्यक्ती : रु. १५० प्रत्येकी
१० पेक्षा जास्त व्यक्तींचा समूह : रु. १०० प्रत्येकी

महाराजा शिवछत्रपति प्रतिष्ठान | 'शिवसृष्टी', आंबेगाव (बु.), कात्रज-देहू बाह्यवळण रस्ता, पुणे

विजय उपासना
भाग-११

नंदन भोजराज

### चालवा डोके!

चला तर मग, सोडवूया हे पहिले कोडे!

तो वेडा नाही, तरीही कागद फाडतो
तो पोलिस नाही, तरीही तो खाकी कपडे घालतो
मंदिर नाही, तरीही घंटी वाजवतो
सांगा पाहू तो कोण?
- उत्तर - वाहक (कंडक्टर)
आहे की नाही गंमत!

### लढवा शक्कल!

आता हे दुसरे कोडे पाहूया!
एक मुलगा १०० फूट उंच असलेल्या शिडीवरून खाली पडला, पण त्याला काहीच दुखापत नाही झाली. हे कसं घडलं असेल?
- उत्तर -जरी शिडी उंच होती, तरी मुलगा पहिल्याच पायरीवरून पडला. त्यामुळे त्याला काहीच लागले नाही.



# गंमतकोंडी

**मित्र-मैत्रिणींनो, मागच्या आठवड्यात आपण काही कोडी सोडवली. या वेळेसदेखील आपण काही नवीन कोडी पाहणार आहोत. यात काही सोपी आहेत, तर काही अवघड! पण ही सर्वच कोडी सोडवायची आहेत बरं का!**



### अवघड कोडे

## हजारो वर्षापूर्वीची ही गोष्ट!

जेव्हा इतर देशातील लोक गुहेत राहत होते आणि कंदमुळे खात होते, त्यांना उद्याच्या जेवणाची काळजी होती, त्या काळात आपल्या भारत देशात अनेक प्रगत विद्यापीठे होती. अशाच एक विद्यापीठातील शिष्याला गुरूने विचारलेले हे कोडे आहे! गुरूंनी विचारले, "प्रिय शिष्या, तू आता विद्यापीठात शिकून बाहेरच्या जगात जात आहेस, तर मला सांग, की जगातील सर्वांत मोठे धन कोणते?"

**शिष्याने मोठ्या अभिमानाने उत्तर दिले -**
**न चौरहार्यं न च राजहार्यं**
**न भ्रातृभाज्यं न च भारकारि।**
**व्यये कृते वर्धत एव नित्यं**
**विद्याधनं सर्वधनप्रधानम्॥**

याचा अर्थ खूप छान आहे. मुलगा म्हणतोय, की "असे एकच धन आहे की, जे चोरीला जाऊ शकत नाही. राजा ते काढून घेऊ शकत नाही. भावांमध्ये वाटले, तरी ते कमी होत नाही. ते दुसऱ्याला दिल्याने अधिकच वाढत जाते. असे वैशिष्ट्य असलेले हे विद्येचे धन जगातील सर्वश्रेष्ठ धन आहे!" हे उत्तर ऐकून गुरू अतिशय प्रसन्न झाले आणि त्यांना खात्री झाली, की हा शिष्य नक्कीच काही तरी मोठे कर्तृत्व करून दाखवणार आहे. खरंच, ज्ञानाच्या जोरावर अनेक चमत्कार करता येतात!

## ज्ञानाची किमया

मित्र-मैत्रिणींनो, आपण जर आजच्या दिवसांत देशोदेशी पाहिले तर, 'गूगल', 'पेप्सी', 'मायक्रोसॉफ्ट' अशा अनेक मोठ्या-मोठ्या कंपन्यांच्या सर्वोच्च पदांवर भारतीय लोक काम करत आहेत. ती सर्व हुशार मंडळी तेथे त्यांच्या ज्ञानाच्या जोरावरच पोहोचली. अशी ही ज्ञानाची किमया! मग आपण नक्कीच खूप गोष्टी शिकूया आणि खूप यश, विजय मिळवूया! भेटूया पुढच्या भागात अशाच काही रंजक गोष्टी आणि नवीन कोडी घेऊन!

? ३) 'इकिगाई' या शब्दाची फोड व अर्थ काय?

✔ १) हिरा व ग्रॅफाइट कार्बन मूलद्रव्याची स्फटिकी अपरूपे आहेत.

# विक्रमांची अजब दुनिया

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.





## चक्क कुत्रे उचलताहेत प्लॅस्टिक!

**मित्र-मैत्रिणींनो, बागेत कचरा टाकू नये, असे सांगूनही अनेक लोकांनी तिथेच कचरा टाकलेला आपल्याला दिसतो. अशा लोकांना आपल्या कृतीतून सकारात्मकतेचा संदेश दिला आहे बॉनी आणि सिंबा या दोन कुत्र्यांनी.** ५ वर्षांची बॉनी 'स्पॅनिएल' प्रजातीची, तर ३ वर्षांचा सिंबा 'बॉर्डर कॉली' प्रजातीचा आहे. युनायटेड किंग्डममधील ओल्गा जोन्स यांच्याकडे ते राहतात. ओल्गा यांना स्वत:ला वस्तूंचा पुनर्वापर (रिसायकलिंग) करण्याची आवड आहे. त्यात त्यांनी आपल्या कुत्र्यांनाही सहभागी करून घेतले आहे. एका मिनिटात १६ प्लॅस्टिकच्या बाटल्या उचलून रिसायकल बिनमध्ये टाकण्याचा विक्रम त्यांच्या कुत्र्यांच्या नावावर आहे.



## सायकलवरची करामत

**तुम्ही कधी हात सोडून सायकल चालवली आहे का? चालवली नसेल, तर लगेच तसे करू नका, कारण त्यात धडपडण्याची खात्रीच आहे! पण २२ वर्षांच्या वैभव राजामणी याने तब्बल १५१.३३ किलोमीटर अंतर हात सोडून सायकल चालवली आहे.** त्याच्या या विक्रमाची 'गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंद झाली आहे. त्याने गतवर्षी गोव्यात पोर्वोरिम इथे हा विक्रम केला. त्याला त्यासाठी ७ तास १८ मिनिटे १३ सेकंद इतका वेळ लागला. वैभवला सायकल चालवण्याची लहानपणापासूनच आवड होती, परंतु हा विक्रम करायचे ठरवल्यावर तो त्यासाठी ५ वर्षे तयारी करत होता.

## केवढे मोठे तळहात व पावले!



**काही माणसे मुळातच धिप्पाड असतात. त्यांचे तळहात आणि पावलेही इतरांपेक्षा मोठी असतात. पण अमेरिकेतील मिशिगनचा एरिक किलबर्न ज्युनियर या केवळ १६ वर्षांच्या मुलाने या विभागात विक्रम नोंदवला आहे.** एरिकच्या तळहाताची लांबी आहे तब्बल २३.२० सेंमी. तर त्याच्या तळपायाची लांबी आहे ३४.३० सेंमी. सर्वसाधारणपणे पूर्ण वाढ झालेल्या पुरूषांच्या बुटाचा साइज ८.५ किंवा ९ असतो. एरिकच्या बुटाचा साइज मात्र अमेरिकन साइज चार्टप्रमाणे २३ आणि युनायटेड किंग्डमच्या साइजप्रमाणे २२ आहे. एरिकला अगदी कधीच दुकानात त्याच्या मापाचे बूट वा हँडग्लोव्हज् मिळत नसत. त्याची या विक्रमासाठी नोंद झाल्यावर मात्र काही कंपन्यांनी त्याला खास त्याच्या मापाचे बूट बनवून दिले. त्याला बास्केटबॉल आणि फुटबॉल खेळायची आवड आहे.

## नाइट ड्रेस घालून ऑफिसला!




नाइट ड्रेस घालून कुणी कधी ऑफिसला जाईल का? पण 'आयकिया' या जगप्रसिद्ध फर्निचर कंपनीने स्वीडनमध्ये आपल्या २,०५१ कर्मचाऱ्यांसाठी चक्क 'पायजमा पार्टी' आयोजित केली होती. या नाइट ड्रेसचे वैशिष्ट्य असे, की ते सर्व प्लॅस्टिकच्या पुनर्वापरातून बनवलेल्या कापडाचे होते. 'आयकिया' कंपनीची दुकाने खूप मोठी असतात आणि फर्निचरबरोबरच तेथील उपाहारगृहातील पदार्थांना ग्राहकांची विशेष पसंती मिळते. तेथील स्विडिश पद्धतीचे वेज्जी बॉल्स, लिंगनबेरी जॅम आणि ग्रेव्ही हा पदार्थ लोकप्रिय आहे. त्यामुळे या पायजमा पार्टीतसुद्धा पायजम्यांवर याच पदार्थांची चित्रे छापलेली होती.

---

स्क्रीन टाइम

मकडी





# रहस्यकथेची उकल

**मित्र-मैत्रिणींनो तुम्हाला भुताच्या गोष्टींची भीती वाटते का? भूतकथा, रहस्यकथा खऱ्या वाटतात का? परंतु भयकथांच्या मागचे रहस्य काही तरी वेगळेच असू शकते. अशा कथा पसरवण्यामागे माणसांचे छुपे हेतू असू शकतात. अशाच एका रहस्यकथेची उकल होते २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मकडी' या हिंदी चित्रपटात.**

**चित्रपटाची गोष्ट :**

चुन्नी आणि मुन्नी या जुळ्या बहिणी आहेत. चुन्नी अतिशय खोडकर, तर मुन्नी शहाणी आहे. त्यांचा मुघले आझम नामक छोटा मित्र आहे. गावात खाटिक म्हणून काम करणाऱ्या कल्लूशी चुन्नीचे नेहमी भांडण होत असते. गावात एक झपाटलेला वाडा आहे. या वाड्याची कथा अशी सांगतात, की 'मकडी' नावाची एक चिटकीण तिथे राहते. वाड्याच्या आवारात कुणी फिरकले तर ती व्यक्ती कोणत्या तरी प्राण्याच्या रूपातच बाहेर येते, अशी वदंता असल्याने गावकरी तिकडे जायला घाबरतात. एकदा कल्लू रागाच्या भरात चुन्नीच्या मागे धावतो. परंतु तो चुकून मुन्नीलाच चुन्नी समजतो. घाबरलेली मुन्नी मकडीच्या वाड्यात शिरते आणि कोंबडीच्या रूपात बाहेर येते. हे कळताच चुन्नी अस्वस्थ होते. ती इतरांकडे मदत मागायचा प्रयत्न करते, पण तिच्या खोड्यांनी आजवर गावकरी इतके त्रासलेले असतात, की कुणीही तिला मदत करत नाही. शेवटी ती एकटीच मकडीचा सामना करायचा ठरवते. मकडी तिला अशी अट घालते, की 'तू जर मला १०० कोंबड्या आणून दिल्यास, तरच मी मुन्नीला पुन्हा माणूस करेन.' दरम्यान चुन्नी-मुन्नीचे एक शिक्षकसुद्धा मकडीच्या वाड्यात शिरतात आणि पाठोपाठ एक कुत्र्याचे पिल्लू बाहेर पडताना गावकरी बघतात. मकडीने शिक्षकांचे कुत्र्याच्या पिल्लात रुपांतर केले, अशी बातमी पसरून गावकरी आणखी घाबरतात. चुन्नी आपल्या बहिणीला आणि शिक्षकांना माणसाच्या रूपात परत आणू शकते का? मकडी खरी कोण असते? तो वाडा झपाटलेला असतो का? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी हा चित्रपटच बघायला हवा.

**चित्रपटाची वैशिष्ट्ये :**

झपाटलेली वास्तू, चेटकीण, जादू, या कथांच्या मागील खरी कारणे या चित्रपटात उलगडतात. चित्रपटातील रहस्य शेवटपर्यंत आपली उत्सुकता टिकवून ठेवते. चुन्नी आणि मुन्नी या दोन्ही भूमिका निभावणारी श्वेता बसू प्रसाद हिच्यासह सर्वच कलाकारांचा अभिनय उत्तम झाला आहे. गाणीही श्रवणीय आहेत.

### कशासाठी बघायचा चित्रपट?

- भूत, चेटकीण, झपाटलेल्या जागा, अशा गोष्टींची भीती वाटत असल्यास.
- भयकथांवर लगेच विश्वास न ठेवता माणसाने चिकित्सक व्हावे. खरे कारण शोधावे, असे हा चित्रपट सांगतो.

---

माय रेसिपी

मित्र-मैत्रिणींनो, बाहेर मिळणाऱ्या सॅलडमध्ये वेगवेगळे सॉस, ऑलिव्ह ऑइल, बालसामिक व्हिनेगर वगैरे घटक वापरतात, हे तुम्हाला माहीत आहे. मात्र, या वस्तू जवळ नसतानासुद्धा चवदार सॅलड्स करता येतात. आज आपण असेच एक सोपे सॅलड बघूया.

## टेस्टी सॅलड

**साहित्य**

१ लहान आइसबर्ग लेट्युसचा वा साध्या सॅलडच्या पानांचा गड्डा, १ गाजर, १ कांदा, १५० ते २०० ग्रॅम पनीर, २ लिंबांचा रस, मीठ, मिरपूड

**कृती**

प्रथम कांदा उभा चिरून त्यावर लिंबाचा रस घालून वेगळा ठेवा, म्हणजे कांद्याचा उग्रपणा कमी होईल. आइसबर्ग लेट्युस वा साधी सॅलडची पाने धुऊन १०-१५ मिनिटे बर्फाच्या पाण्यात घालून ठेवा आणि निथळून जाडसर, चौकोनी चिरून घ्या. गाजर उभे, मध्यम जाडीचे चिरून घ्या. पनीरचे तुकडे करून नॉनस्टिक पॅनमध्ये ते कोरडेच सोनेरी रंगावर परतून घ्या. सॅलड करण्यासाठी मोठा बाऊल घ्या. कांद्यात घातलेला लिंबाचा रस निथळून नुसता कांदा सॅलड बाऊलमध्ये घाला. त्यात लेट्युस/ सॅलड, गाजर, पनीरचे तुकडे घाला. अंदाजाने मीठ आणि मिरपूड घालून हाताने नीट एकत्र करा. हे सॅलड केल्यावर लगेच खा.

**काय काळजी घ्यावी?**

भाज्या व पनीर चिरताना सुरी वापरावी लागणार आहे, तसेच पनीर परतताना गॅसचा वापर करायचा आहे. या दोन्ही कामांसाठी आई-बाबा बरोबर असलेले चांगले.

### प्रयोग करा

या सॅलडमध्ये ब्रेडचे तव्यावर परतून कडक केलेले 'क्रूटॉन्स', थोडेसे भाजलेले अक्रोड, उकडलेले/ ताजे, कच्चे मक्याचे दाणेसुद्धा वापरता येतील. आदल्या दिवशीच्या उरलेल्या पोळीचे नॅचो चिप्ससारखे तुकडे करून तव्यावर थोड्या तेलावर परतून कुरकुरीत करून घ्यावेत आणि या सॅलडबरोबर द्यावेत. हे आगळेवेगळे कॉम्बिनेशनही उत्तम लागते.



? ४) 'मकडी' चित्रपटात दुहेरी भूमिका कोणी केली आहे.

✓ ८) पावसाची नक्षत्रे ९ असतात.

माय पेट

आदित्य साखरे

AARYANS WORLD SCHOOL Presents सकाळ peto pia







# प्राण्यांना कसे शिकवावे?

तुमचा पाळीव कुत्रा किंवा मांजर हा तुमचा सर्वांत चांगला मित्र होऊ शकतो; पण त्यांनी चांगले वागावे यासाठी आणि तुमच्याही सोयीसाठी त्यांना प्रशिक्षण देणे खूप महत्त्वाचे आहे. प्रशिक्षणाने ते शिस्तबद्ध होतात आणि तुमचे त्यांच्याबरोबरचे नाते आणखी दृढ होते. चला तर मग, जाणून घेऊया पाळीव प्राण्यांना प्रशिक्षण देण्याच्या काही सोप्या पद्धती.

## सकारात्मक अंमलबजावणी (Positive Reinforcement)

**बक्षिसे द्या :** जेव्हा तुमचा पाळीव प्राणी योग्य वर्तन करतो, तेव्हा त्याला त्याच्या आवडीचा खाऊ द्या किंवा त्याच्याबरोबर खेळा.

**प्रशंसा करा :** त्याच्या चांगल्या वर्तनासाठी कौतुकाचे शब्द वापरा. उदाहरणार्थ- 'शाब्बास!' किंवा 'चांगलं काम केलंस!'

## सातत्य ठेवा

पाळीव प्राण्यांच्या प्रशिक्षणाच्या बाबतीतले नियम निश्चित करा. घरातील सर्व सदस्यांनी एकसारखे नियम पाळा.

**दैनंदिन वेळापत्रक :** रोज एकाच वेळी प्रशिक्षण द्या. यामुळे पाळीव प्राण्यांना त्याची सवय लागेल.

## लहान उद्दिष्टं ठेवा

- सोप्या कमांड्सपासून सुरुवात करा. 'बस', 'उठ', 'ये', 'राहू दे', अशा सोप्या आदेशांपासून सुरू करा.
- एका वेळी एकच गोष्ट शिकवा. एक गोष्ट पूर्ण शिकवल्यानंतरच पुढच्या गोष्टीकडे वळा.

## संयम ठेवा

- रागावू नका. जर कुत्रा किंवा मांजर एखादी गोष्ट लगेच शिकले नाही, तर रागावू नका. त्यांना वेळ द्या.
- सकारात्मक रहा. तुमचा आनंद आणि प्रेम त्यांना अधिक शिकण्याची प्रेरणा देईल.

## शारीरिक शिक्षा नको

- मारू नका, ओरडू नका. त्यामुळे ते घाबरतील आणि तुमच्यापासून दूर जातील.
- नकारात्मकतेपेक्षा सकारात्मकतेवर भर द्या. चुकीच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करा आणि योग्य वर्तनावर लक्ष केंद्रित करा.

## मांजरींचे प्रशिक्षण

- मांजरी स्वतंत्र असतात. त्यामुळे त्यांना कुत्र्यांसारखे प्रशिक्षण देणे थोडे आव्हानात्मक असू शकते.
- खाऊचा वापर करा. त्यांच्या आवडीचा खाऊ देऊन त्यांना प्रोत्साहित करा.
- खेळणी वापरा. खेळण्यांच्या मदतीने त्यांना विविध क्रिया शिकवा.

## सामाजिकीकरण (Socialization)

- इतर पाळीव प्राण्यांशी त्यांची ओळख करून द्या. त्यांना आजूबाजूच्या भागातील कुत्रे, मांजरी किंवा लोकांबरोबर वेळ घालवू द्या.
- नवीन ठिकाणी घेऊन जा. विविध ठिकाणी नेल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल.



## व्यावसायिक मदत घ्या

**प्रशिक्षकांची मदत :** जर तुम्हाला आवश्यकता वाटली, तर व्यावसायिक प्रशिक्षकांची मदत घ्या.

**ऑनलाइन साधने :** इंटरनेटवर पाळीव प्राण्यांच्या प्रशिक्षणासंबंधी अनेक व्हिडिओ आणि लेख उपलब्ध आहेत. त्याची तुम्हाला मदत होऊ शकेल.

पाळीव प्राण्यांचे प्रशिक्षण ही एक प्रक्रिया आहे. त्यासाठी वेळ, संयम आणि प्रेम आवश्यक आहे. तुमच्या पाळीव प्राण्याला शिकवताना प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या. योग्य प्रशिक्षणाने तुमचा कुत्रा किंवा मांजर कुटुंबातील एक शिस्तबद्ध आणि आनंदी सदस्य होईल.



खेळ खेळूयात

# अस्वल, ससा, उंट!

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

**समन्वय हे खेळाडूंसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत कौशल्यांपैकी एक आहे. हे कौशल्य विकसित करण्यासाठीचा खेळ आपण आज पाहणार आहोत. या खेळासाठी केवळ घरात असलेल्या छोट्या वस्तू लागतात.**

### कृती

- गोल आकार आखून त्यावर खेळाडूंना उभे करावे. खेळाडूंचे २ किंवा ३ गट करून घ्यावेत.
- त्यांना प्राण्याची नावे द्यावीत- जसे की, ससा, अस्वल, उंट, घोडा.
- हे खेळाडू सलग उभे न करता एकाशेजारी दुसरा अशा पद्धतीने उभे करावेत.
- गोलाच्या आत आणखी एक लहान गोल आखून त्यावर काही वस्तू ठेवाव्यात. जसे की, बॉल, रूमाल, डम्बेल इत्यादी.
- गटनायकाने गोलाच्या बाहेर उभे राहून आज्ञा द्याव्यात. उदा. ससा गटाने रूमाल उचलून आणणे.
- ही आज्ञा मिळाल्यावर ससा गटाने सशासारख्या उड्या मारत जाऊन रूमाल उचलून आणून तो मोठ्या गोलावर ठेवावा.
- जो गट जास्तीत जास्त अचूक वस्तू आणेल तो विजयी होईल.
- जो खेळाडू चुकीच्या पद्धतीने खेळेल किंवा चुकीची वस्तू उचलेल तो बाद होईल.
- बाद खेळाडूंना गोलाबाहेर उभे करून त्यांना काही एकत्रित शिक्षा द्या. जसे की, २० जोर, बैठका मारणे इ.

### कौशल्ये

- या खेळात सावधपणा, एकाग्रता, आणि प्रतिक्रिया वेळ, तोल या सर्व कौशल्यांचा कस लागतो. हाता-पायांतील ताकद वाढते. शरीराची स्थिरता सुधारते.
- हा खेळ सर्व मोठ्या खेळांसाठी पूरक आहे.



अॅप माझे

## 'हार्पर किड्स' (यू-ट्यूब)

**मित्र-मैत्रिणींनो, लहानपणी आपण आजी-आजोबा, आई-बाबांकडे 'गोष्ट सांगा' म्हणून हट्ट करायचो. आता गोष्टी सांगणारी 'अॅप्स' आली आहेत. मात्र, प्रमुख अडचण अशी, की यातील बहुतेक अॅप्स सशुल्क असतात. मराठी माध्यमात शिकणारी मुले-मुली इंग्लिश शिकत असली, तरी त्यातील अनेकांच्या मनात इंग्लिश भाषेविषयी भीती असते. ती घालवायची असेल, तर सोपी 'ऑडिओ बुक्स' ऐकणे हा एक उत्तम उपाय आहे. असे एक खास लहान मुलांसाठीचे विनाशुल्क ऑडिओ बुक चॅनेल 'यू-ट्यूब'वर आहे, ते म्हणजे 'हार्पर किड्स'.**

**वैशिष्ट्ये :** इंग्लिश भाषा समजण्यात अडचण येणाऱ्या, बोलण्याची भीती वाटणाऱ्या मुलांना उपयोगी पडेल असे एक यू-ट्यूब चॅनेल म्हणजे 'हार्पर किड्स'. 'हार्परकॉलिन्स' प्रकाशनाच्या या मोफत चॅनेलवर अनेक इंग्लिश ऑडिओ बुक्स आहेत. प्ले-लिस्टमध्ये ती 'स्टोरीटाइम रीड अलाउड' आणि 'रीड अलाँग' या उपशीर्षकांखाली मिळतील. यातील काही पुस्तके छोट्या मुलांची वाटू शकतील. परंतु इंग्लिशचे उच्चारण कसे करावे, हे त्यातून लक्षात येते. 'रीड अलाऊड' वा 'रीड अलाँग' पद्धतीमध्ये आपण व्हिडिओ बघताना स्क्रीनवर दिसणारी वाक्ये वाचत असतो आणि त्याबरोबरीने तीच वाक्ये गोष्टीरूपांत ऐकतो. त्यामुळे इंग्लिश चांगल्या प्रकारे समजायला मदत होईल आणि इंग्लिश बोलण्याचा आत्मविश्वास वाढू शकेल.

HARPER KIDS

## ऑडिओ बुक्सची पर्वणी

### कोणासाठी?

- गोष्टी ऐकायला आवडणाऱ्यांसाठी
- इंग्लिशची भीती असणाऱ्यांसाठी

### तुम्ही काय करू शकता?

- या चॅनेलवरून प्रेरणा घेऊन तुम्ही तुमच्या वर्गात एक अभ्यासपूर्ण खेळ खेळू शकता.
- प्रत्येक विद्यार्थ्याने इंग्लिशचा जादाचा अभ्यास म्हणून केवळ १० वाक्यांची नवी गोष्ट रचून लिहून काढायची.
- वहीच्या पानांवर तोडकीमोडकी चित्रे काढून ती गोष्ट चित्ररूपात उतरवायची.
- वर्गात त्या गोष्टीचे 'रीड अलाँग' सादरीकरण करायचे. असे करताना तुम्ही गोष्टीचे एकेक वाक्य वाचायचे आणि तुमचा मित्र/मैत्रीण शेजारी उभे राहून त्या-त्या वाक्यांनुसार चित्रे दाखवतील.




? ५) कुत्रा व मांजर यांच्यात कुणाला प्रशिक्षण देणे सोपे असते?

✔ ३) 'इकि' म्हणजे 'लाईफ' व 'गाई' म्हणजे 'टू बी वर्थव्हाइल'. म्हणजे आयुष्य अर्थपूर्ण जगणे.

# At a Car Showroom



Alchemize

## Initial Inquiry

**Scenario :** You enter a car showroom and approach a sales representative.

**You :** "Hello, I'm interested in buying a car. Could you tell me about the models you have available ?"

**Sales Representative :** "Sure ! We have a range of models from compact cars to SUVs. Are you looking for something specific ?"

**You :** "I'm looking for a family car with good fuel efficiency and safety features. Can you recommend something ?"

**Sales Representative:** "I'd suggest our latest SUV model. It has great safety ratings and fuel efficiency. Would you like to see it ?"

**You :** "Yes, that sounds good."

## Requesting a Test Drive

**Scenario :** After discussing options, you decide to test drive a car.

**You :** "I'd like to test drive the SUV we discussed. What's the procedure ?"

**Sales Representative :** "We can arrange that now. I just need your driver's license and some basic info. Is that okay ?"

**You :** "Sure, here's my driver's license. Do I need to fill out any forms ?"

**Sales Representative:** "Yes, just a short form. I'll get that for you."

## Discussing Financing Options

**Scenario :** You're interested in financing options.

**You :** "Can you provide details on financing, including loan terms and monthly payments ?"

**Sales Representative:** "Of course. We have various financing plans. Do you have a budget or down payment in mind ?"

**You :** "I'd like to keep my monthly payments under $300. What are my options ?"

**Sales Representative:** "We can review some plans that fit your budget. Let's go over them."

## Inquiring About Warranty and Service

**Scenario :** You want to know more about the warranty and service packages.

**You :** "What about the warranty and service packages for this car ?"

**Sales Representative :** "This model has a 3-year warranty and free maintenance for the first year. We also offer extended packages."

**You :** What's covered under the warranty ? Are there extra costs for extended packages ?"

**Sales Representative :** "The warranty covers major components. Extended packages can be customized. I can give you a detailed cost breakdown."

# STORY WRITING

### Internal Conflicts

**Definition :** Struggles happening inside a character's mind or emotions.

**Impact :** Influences the character's decisions and actions.

**Example :** Maya loves painting but fears she won't succeed and might face financial issues. Her fear and self-doubt are internal conflicts because they are mental and emotional struggles.

### External Conflicts

**Definition :** Challenges that come from outside the character, such as problems with people, environment, or situations.

**Impact :** Forces the character to take action or make decisions.

**Example :** Maya's artwork is rejected by a gallery. This external conflict is a tangible problem she must deal with, which can lead her to either improve her work or find new opportunities.

### Combining Both Conflicts

**Definition :** Internal and external conflicts are often connected, making the character's struggle more intense and layered.

**Impact :** Creates a more engaging and realistic story.

**Example :** Maya's internal fear of failure is made worse by the gallery's rejection. This combination of fears and challenges makes her journey more compelling.

### Why Internal Conflicts Matter

**Reason :** Adds depth and relatability to the character.

**Effect :** Shows the character's personal struggles and emotional journey.

### Why External Conflicts Matter

**Reason :** Drives the plot forward with obstacles.

**Effect :** Provides action and challenges for the character to overcome.

Including both types of conflicts helps to create a richer, more engaging story and keeps readers invested in the character's journey.



# With Friends...

शीतल करंदीकर

दोस्तांनो, तुमच्या बरोबरीचं कोणी तुम्हाला भेटलं, तर काय बोलायचं? कसं बोलायचं? असे प्रश्न तुम्हाला पडत असतील ना! विशेषतः हे जर इंग्लिशमध्ये बोलायचं असेल, तर आपण चुकू नये असंही वाटतं ना! त्यामुळे त्या व्यक्तीशी इंग्लिशमध्ये कसा संवाद सुरू करता येईल ते आज पाहूया. अशा वेळी आपण त्या नवीन मित्राला किंवा मैत्रिणीला कशा प्रकारे वेगवेगळे प्रश्न विचारू शकतो, ते आता जाणून घेऊया!

- तुझं नाव काय आहे ? – What is your name ?
- तू कुठे राहतोस ? – Where do you stay/live ?
- तू कोणत्या शाळेत जातोस ? – Which school do you go to ?
- तू कोणत्या इयत्तेत शिकतोस ? – In which standard do you study ? / Which standard do you study in ?
- तू याच शहरातला आहेस का ? – Are you from this city itself ?
- (नसल्यास) मग या आधी कुठे राहत होतास ? – (If not) Then, where were you living before this ?
- तुला भाऊ किंवा बहीण आहे का ? – Do you have a brother or a sister ? / Do you have any sibling ?
- तुला काय करायला आवडतं ? – What do you like to do ?
- तुला काय करायला आवडत नाही ? – What do you not like to do ?
- तुझ्या घरी (कुटुंबामध्ये) कोण कोण असतं ? – Who all are in your family ?

अनोळखी माणसांशी बोलण्याचे अनेक प्रसंग येतात. त्यावेळी आपल्याला वापरता येतील अशी अजून काही वाक्यं सांगते.


- माफ करा, तुम्हाला हा पत्ता माहिती आहे का ? – Excuse me, do you know this address ?
- तुम्हाला काही मदत हवी आहे का ? – Do you need any/some help ?
- तुम्हाला काही मदत हवी असल्यास कृपया मला सांगा. – Please tell me if you need any help.
- इथे कृपा करून कचरा टाकू नका. – Please do not throw rubbish/waste/garbage here. (लक्षात घ्या – कचरा या शब्दासाठी आपण rubbish, waste, garbage यापैकी कोणताही शब्द वापरू शकतो.)
- इथे आसपास सायकल दुरुस्तीचं दुकान आहे का ? – Is there a cycle-repairing shop nearby ?

आणि आता वेळ झालीये आजच्या गंमतपाठाची! आता जर तुमच्या वर्गात एखादा नवीन मुलगा किंवा मुलगी आली तर विचार करा बरं तुम्ही आणखी काय काय विचाराल ते. अशा वेळी तुम्ही इंग्लिशमध्ये कोणती वाक्य वापराल? प्रयत्न करा! गरज वाटल्यास आई-बाबांची मदत घ्या!



STORY

# The Forgetful Squirrel



Siddhi Sathe

In a lively forest, there lived a squirrel named Oliver. Oliver was known for his fluffy tail and friendly nature. He was always busy collecting nuts and berries to prepare for the winter. However, Oliver had a little problem—he was very forgetful.

One crisp autumn day, Oliver found a large, shiny acorn. Excited, he scurried to his favorite hiding spot under an old oak tree and buried the acorn carefully. "This will be a great treat for winter," he thought, patting the ground to cover it.

A few days later, Oliver was busy gathering more food when he spotted a beautiful pinecone. He decided to hide it with his special acorn. But as he was hiding it, he became distracted by a colorful butterfly fluttering by. He chased the butterfly, completely forgetting where he had buried the acorn.

Weeks passed, and the forest began to change colour with the arrival of winter. Oliver, now needing his acorn, searched frantically under the oak tree. He dug up every spot but couldn't find his precious acorn.

Feeling a bit sad, Oliver went to his friend Lily, the wise old owl, for advice. "Lily, I've lost my acorn. I'm so forgetful, and now I can't find it!"

Lily smiled kindly. "Don't worry, Oliver. You can still find other food. And maybe next time, you can make a map or leave a mark so you don't forget."

Oliver took Lily's advice to heart. He found some nuts and berries and was prepared for winter, even if he never found that special acorn. From then on, Oliver made little notes and marks to help him remember where he had hidden his treasures. He learned that with a bit of planning, forgetfulness could be managed, and he happily enjoyed the winter with plenty of food.

# About 'WE'

Shailesh Barge




In the last article, we discussed the pronoun 'I' . Isn' t it clear now? You are right. 'I' is the pronoun you use individually for yourself. I use pronoun I for myself. Each one uses it for oneself to tell what one is, what one has, and what one does.

Many times, you talk about yourself and about someone along with you. For example, when you talk about yourself and your brother, what do you say? Read the following passage.

"We are brothers. We are twins. We have an elder sister. We have a big family. We help each other. We love each other."

Similarly, when you talk about you and your sister/sisters, about you and your friend/friends, about you and other person/ persons- You should use pronoun WE.

For example.


When you talk about you and your sister/sisters - We are sisters. We have a doll. We play with it.

When you talk about you and your friend/friends - We are friends. We have a football. We enjoy together.

When you talk about you and other person/persons - We are neighbour. We have a tennis court. We keep it clean.

Let us play one interesting game. There will be few activities. Think, whom do you do them with? You have few options. Complete the table. Write those activities in the table. Study the example.

Activity With whom
We (I and my sibling) We (I and my friend) We (I and neighbour)
Ex. Playing cards We play cards. We play cards. We play cards. We don' t play cards.
Cooking new dishes
Playing tennis
Exercise
Walking dogs
We walk dogs together.




GRAMMAR BITE

# Third Conditional



"Understanding the Third Conditional: What Could Have Been"

The third conditional is used to talk about imaginary situations in the past—things that didn't actually happen but could have. Here"s how it works:

**Structure :** "If + past perfect, + would have + past participle."

**Example :** "If I had studied harder, I would have passed the exam." (I didn't study hard, so I didn't pass.)

Use it for regrets or missed opportunities: You use it to express what might have happened differently if the past had been different.

**Example :** "If they had left earlier, they wouldn't have missed the train."

**Remember :** It's all about looking back at what could have changed a past outcome.

**Fun tip :** Think of it like a "what if" game for missed chances!



## सुभाषित

**करे दानं हृदि ध्यानं मुखे मौनं गृहे धनम् ।**
**तीर्थे यानं गिरि ज्ञानं मण्डनं महतामिदम् ।।**

हातात दानशूरपणा, हृदयात ध्यान, तोंडी मौन, घरात धनसंपत्ती, तीर्थक्षेत्रांना भेटी देणे, वाणीमध्ये ज्ञान, हेच खरे अलंकार आहेत.

# संस्कार

**आनंददायी शनिवार**

## सुविचार

रोजच्या प्रार्थनेत शब्द नसतील तरीही चालेल,
पण हृदय हवे. हृदयाशिवाय आलेले शब्द मात्र नकोत.
**- महात्मा गांधी**



## गीता श्लोक

**मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् |**
**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥**

माझ्याशी एकचित्त झालेले माझ्याशी एकप्राण झालेले माझे भक्त एकमेकांना बोध देतात .माझ्याच कथा, माझेच गुणवर्णन परस्परांना सांगतात. त्यातच संतुष्ट होतात. रमून जातात.



## दिनविशेष





**२७ सप्टेंबर**

**२०१५ : प्रतिभाशाली बिलियर्डसपटू पंकज अडवानीने चौदावे जागतिक विजेतेपद संपादन करीत कारकिर्दीत आणखी एक यशाचा टप्पा गाठला.**



**२८ सप्टेंबर**

**२०१४ : इन्चॉन आशियाई क्रीडा स्पर्धेत कुस्तीमध्ये योगेश्वर दत्तने आशियाई स्पर्धेत ६५ किलो वजनी गटात तजाकिस्तानच्या झालिमखान युसुपोव याच्यावर मात करत सुवर्णपदक पटकाविले. तब्बल २८ वर्षांनी भारताला सुवर्णपदक मिळाले होते.**



**२९ सप्टेंबर**

**२००१ : राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते बॅडमिंटनपटू पी. गोपीचंदला राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार प्रदान.**

**बोधकथा**

**प्रशांत सरुडकर**



## एकमेका साह्य करू

**उंच डोंगराच्या कडेला एक नदी वाहत होती. वर्षभर ती दुथडी भरून वाहत असे. तो परिसर मोठा रम्य होता. डोंगर, दऱ्या तसेच लतावेलींनी या नटलेल्या प्रदेशात अनेक पक्षी मोठ्या आनंदाने राहत असत. कबुतरांसाठी तर हा परिसर अतिशय रम्य होता.** नदीजवळच्या झाडावर बसून ही सर्व कबुतरे आकाशात भरारी घेत. कबुतरांचे जीवन मोठे आनंददायी होते. एके दिवशी झाडाच्या नदीकडच्या फांदीवर एक कबूतर बसलेले होते. सहज त्याचे लक्ष पाण्याकडे गेले.

एक छोटीशी मुंगी पाणी पिण्यासाठी नदीच्या पात्राजवळ गेली आणि अचानक पाय घसरून पाण्यात पडली. हालचाल करूनही ती बाहेर येण्याचा प्रयत्न करत होती, पण पाण्याच्या प्रवाहामुळे ती आतमध्ये खेचली जाऊ लागली. कबुतराने हे पाहताच त्याला मुंगीची दया आली. त्याने झाडाचे एक मोठे पान तोडले आणि अलगद मुंगीच्या जवळ सोडले. मुंगी त्या पानावर बसली आणि हळूहळू पान नदीच्या कडेला येताच मुंगी किनाऱ्यावरती आली. कबुतराला अतिशय आनंद झाला. मुंगीने कबुतराकडे पाहून पुढचे दोन्ही पाय उंचावून कबुतराचे आभार मानले.

काही दिवसानंतर एक घटना घडली. त्या परिसरात कबुतरे जास्त आहेत हे पाहिल्यानंतर एक शिकारी कबुतरांची शिकार करण्यासाठी त्या परिसरात आला. त्याच्या हातात गलोल होती. मुंगीला वाचवलेले कबूतर झाडावरती शांतपणे डोळे मिटून विश्रांती घेत होते. या कबुतराकडे पाहताच शिकाऱ्याने गोलोल ताणली आणि कबुतरावर नेम धरला. मुंगीच्या ही गोष्ट लक्षात आली. ती पटकन शिकाऱ्याच्या पायावर चढली. त्याच्या गलोलीतून दगड सुटणार, तेवढ्यात मुंगीने शिकाऱ्याच्या पायाला कडकडून चावा घेतला. शिकाऱ्याचा नेम चुकला. तो दगड झाडावर जाऊन आदळला आणि शिकारी शिकार करत असल्याचे कबुतराच्या लक्षात आले. त्याने आकाशात उंच भरारी घेतली. शेजारच्या झाडावर बसलेल्या दुसऱ्या कबुतराने शिकाऱ्याला मुंगीने घेतलेला चावा पाहिला होता. थोड्या वेळानंतर शिकारी तेथून निघून गेला. कबूतर झाडाजवळ येताच, दुसऱ्या झाडावरील कबुतराने मुंगीमुळे त्याचे प्राण वाचल्याचे या कबुतराला सांगितले. कबुतराला मुंगीविषयी अतिशय आत्मीयता वाटली. तो मुंगीजवळ गेला आणि म्हणाला, 'ताई धन्यवाद! तुझ्यामुळे माझे प्राण वाचले.' मुंगी म्हणाली, 'मित्रा, तुही माझे प्राण वाचवले होते. जंगलात राहणारे सर्व प्राणी आपल्या परिवारातीलच आहेत. म्हणून एकमेकांना साह्य केले पाहिजे.'

**गुड मॅनर्स**

## 'शेअरिंग'ची सवय

**दोस्तांनो, तुम्हाला घरी, शाळेत 'शेअरिंग' करा असं सांगितलं जात असेलच ना? शेअरिंग केल्याने काय काय फायदे होतात, हेदेखील सांगितलं जात असेल. मात्र, तरीही तुमच्यातले काही जण शेअरिंग करत नाहीत, बरं का! असं होत असेल तर ते चूक आहे.** त्यामुळे तुम्ही शेअरिंग करण्याची सवय लावून घ्या. तुमची पुस्तके, खेळणी, खाऊ हे इतरांनाही द्या. तुम्ही असं केलं, तर समोरचा तुमचा मित्र किंवा मैत्रीणही तुम्हाला त्याची/तिची खेळणी, पुस्तके, खाऊ देईल. तुमची मैत्री वाढेल.

तुम्ही शेअरिंग करू लागलात, तर सर्व लोक तुमच्याकडे येतील. तुमच्याशी स्वतःहून बोलतील. तुम्हाला मदत करतील आणि अडचणीच्या वेळी तुमची मदतही घेतील. तुमचे म्हणणे ऐकून घेतील. यामुळे तुम्हाला नवनवीन गोष्टींचा आनंदही घेता येईल.




कारण शेअरिंग केल्याने तुम्हाला नवीन पुस्तके वाचायला मिळतील. नवीन खेळणी खेळायला मिळतील. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शेअरिंग करताना आपण आपोआपच समोरच्या व्यक्तीशी बोलत जातो. त्यामुळे संवाद साधला जातो. एकमेकांचा स्वभाव कळतो. आपल्या दोस्तांचं एक 'वर्तुळ' आपोआपच तयार होत जातं.

त्यामुळे तुम्हाला काही अडचण आल्यास तुम्ही त्यांची मदत घेऊ शकता.

जे लोक शेअरिंग करत नाहीत, त्यांना फार मित्र नसतात. त्यांची कोणाशीच दीर्घ काळ मैत्री टिकत नाही. सगळे लोक त्यांना दूर लोटतात. त्यांना आपल्या घरी फार कोणी बोलवत नाही. शाळेतही त्यांचे फार 'ग्रुप्स' नसतात.

त्यामुळे दोस्तांनो, भरपूर शेअरिंग करा. एकत्र राहा. एकत्र अभ्यास करा. एकत्र खा-प्या आणि मजा करा.

**अवकाश**


**सदानंद होशिंग**

## नक्षत्र विचार- भाग ४

**पूर्वी एक कोडे घातले जायचे, की २७ वजा ९ किती? सरळ उत्तर असायचे १८. पण पूर्वज सांगायचे, की २७ वजा ९ म्हणजे शून्य! कारण होते, की २७ नक्षत्रांपैकी ९ नक्षत्रे ही पावसाची आहेत. तीच जर वगळली, काय उरणार आहे! आज आपण सुरूवात करणार आहोत पुढच्या नक्षत्रांना. ही आहेत पावसाची नक्षत्रे.**

**पुढील नक्षत्र आहे 'मृगशीर्ष'**

**मृगशीर्ष :** हे पावसाचे पहिले नक्षत्र मानले जाते. याची सुरुवात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होते. या नक्षत्राला हिंदीमध्ये 'मृगशीरा' असेही



म्हणतात. बोली भाषेत याला 'मृग नक्षत्र' म्हणतात. या नक्षत्रात सात तारे असून त्याचा आकार हरणाच्या मस्तकासारखा आहे. हे नक्षत्रमंडलातील पाचवे नक्षत्र आहे. याचे पहिले दोन चरण वृषभ राशीत, तर शेवटचे दोन चरण मिथुन राशीत येतात. याचे इंग्रजी नाव λ, φ Orionis आहे. या नक्षत्राची खगोलीय स्थिती 23TA40- 06GE40 अशी आहे. शेतकरी या नक्षत्रापासून पावसाची आतुरतेने वाट पाहत असतो.

**आर्द्रा :** इतर नक्षत्रांप्रमाणे हा



ताऱ्यांचा समूह नसून यात केवळ एकच तारा आहे. जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात याचा उदय होतो आणि फेब्रुवारी महिन्यात रात्री ९ ते ११ दरम्यान ते दिसू शकते. हे नक्षत्र एखाद्या मण्याप्रमाणे किंवा अश्रूच्या थेंबाप्रमाणे दिसते. आर्द्रा नक्षत्र मिथुन राशीत येते. याचे इंग्रजी नाव Betelgeuse आहे. याची खगोलीय स्थिती 06GE40 - 20GE00 आहे. नक्षत्र मंडलातील हे सहावे नक्षत्र आहे.

## नटराजासन : प्रकार एक

**योग जीवन**

**मनाली देव**

**नटराजासन हे दंड स्थितीमधील तोलात्मक आसन आहे. हे स्पर्धात्मक आसन आहे.**

### असे करावे आसन

- आसन करण्यासाठी प्रथम ताठ उभे राहावे.
- त्यानंतर एक पाय गुडघ्यात वाकवून हाताने पायाचा अंगठा किंवा पाऊल पकडावे.
- यापूर्वी आपण एकपाद राजकपोतासन कसे करतात हे बघितलेच आहे. तीच स्थिती आपण दंडस्थितीमधून करणार आहोत. त्यामध्ये ज्या हाताने पाऊल पकडले आहे, तो हात कोपऱ्यातून वळवून घ्यावा व पाय जास्तीत जास्त वरच्या दिशेला घेऊन पायाचा तळवा डोक्याच्या मागच्या बाजूला टेकवण्याचा प्रयत्न करावा.
- तो व्यवस्थित टेकला की, दोन्ही हातांनी पाऊल किंवा पायाचा अंगठा पकडावा.
- जेवढा वेळ आसनस्थितीमध्ये स्थिर राहता येईल, तेवढा वेळ प्रयत्न करावा.
- श्वसन संथ गतीने सुरू ठेवावे.
- आसन सोडताना सावकाश सोडावे व दुसऱ्या पायानेही हे आसन करावे.

### लाभ

- या आसनाच्या नियमित सरावाने लवचिकपणा वाढतो.
- मन एकाग्र होते व ते शांत राहण्यास मदत होते.

विद्यापीठ योगासन स्पर्धेच्या अभ्यासक्रमांमध्ये हे आसन आहे.



**काळजी :**
- **हे आसन सुरुवातीला जेवढे जमेल तेवढेच करावे किंवा भिंतीच्या आधाराने करावे.**

## 'देव' भेटलेला विद्यार्थी!

**वाचू आनंदे**

**देव कुठे राहतो? कुठे असतो? याबद्दल आपल्याला काहीच माहिती नसते. त्यामुळे आपल्याला असे अनेक प्रश्न पडतात. मात्र, सूर्यकांत नावाच्या एका विद्यार्थ्याला देव भेटला आहे आणि त्यामुळे तो काय काय करतो? हे जर तुम्हाला जाणून घ्यायचं असेल, तर त्यासाठी चंद्रकान्त भंडारी लिखित 'देव भेटलेला विद्यार्थी' हे पुस्तक आवर्जून वाचा.**

**एक दिवस सूर्यकांत त्याच्या भाऊकाकांकडे येतो आणि ते दोघे खूप बोलतात. गप्पा मारतात. त्यातल्या बऱ्याचशा गप्पा अभ्यासाशी संबंधित असतात. अभ्यास करण्याच्या विविध पद्धती, उपक्रम, त्यांचे फायदे काका त्याला सांगतात. सूर्यकांत ते सगळं लिहून घेतो. त्यानंतर तो काकांना त्याने पाहिलेल्या काही गमती-जमती सांगतो आणि काकादेखील ते सर्व टिपून घेतात. काका त्याला योग्य ते बदलही सुचवतात.**

**सूर्यकांत आणि भाऊकाकांच्या या गप्पा म्हणजे अभ्यास कसा करावा? परिपाठ कसा असावा? शाळेत व शाळेच्या बाहेरही कोणकोणते उपक्रम राबवता येतील? या सर्व माहितीचा एक खजिनाच आहे. त्यामुळे हे पुस्तक विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षक व पालकांसाठीही उपयुक्त आहे. लेखकाने स्वतः शिक्षक म्हणून काम केले असल्याने त्या अनुभवाची मांडणीच या पुस्तकातून झाली आहे.**




? ८) पावसाची नक्षत्रे किती असतात?

✓ २) आंबा हे फळ उन्हाळ्यात येते.

# ड्रॅगनभूमीत भावंडांची धमाल!

कार्टूनची सफर

अरविंद रेणापूरकर



**‘ड्रॅगन’ म्हटल्यावर आग ओकणारा काल्पनिक प्राणी डोळ्यांसमोर येतो. पण ‘ड्रॅगन टेल्स’ या मालिकेने ड्रॅगन्सचे एक वेगळे रूप समोर ठेवले. यातील ड्रॅगन मुलांचे मित्र आहेत. परंतु ‘ड्रॅगन टेल्स’मधील प्रमुख पात्रे म्हणजे दोन लहान मुले- सहा वर्षांची ‘एमी’ आणि तिचा भाऊ- चार वर्षांचा ‘मॅक्स’. ही मालिका बघताना आपणही स्वतःला त्यांच्या जागी ठेवतो आणि ड्रॅगनविश्वाची सफर करून येतो!**

## ड्रॅगन्सचे विश्व

एमी आणि मॅक्स यांना खेळण्याच्या खोलीत एका रहस्यमयी बॉक्स सापडतो. त्यात लिहिलेली कविता दोघं वाचतात- ‘चाहूँ मैं चाहूँ, दिल से मैं चाहूँ... ड्रॅगन के संग उडकर दूर देश चला जाऊँ’. कविता म्हणताच भिंतीवरच्या चित्रातील ड्रॅगन अचानक सजीव होतात. ते एमी आणि मॅक्सला घेऊन आपल्या विश्वात जातात. लहान मुलांचे मनोरंजन करणारी ‘ड्रॅगन टेल्स’ ही मालिका उत्तर अमेरिकेत २००५ च्या सुमारास प्रसारित झाली. ती पुन्हा २०१० मध्ये दाखवण्यात आली. भारत आणि पाकिस्तानमध्येही या मालिकेचे २०५ भाग हिंदीतून प्रसारित करण्यात आले.

## साध्या, आकर्षक गोष्टी

एकदा नेहमीप्रमाणे एमी आणि मॅक्स ड्रॅगनलँडमध्ये येतात. तिथे एका ‘टॅलेंट शो’चे आयोजन केलेले असते. कोणी कशाचे सादरीकरण करायचे, यावर सर्वजण चर्चा करतात. एमी केसीला फुटबॉल खेळून दाखवायला सांगते. केसी जेव्हा फुटबॉल टोलावते, तेव्हा तो बॉल ऑर्डच्या (निळ्या ड्रॅगनच्या) घशात अडकतो. शेवटी केसीच त्याच्या घशात अडकलेला बॉल काढते. त्यांचा दुसरा मित्र जॅकी एक धून वाजवून दाखवतो. मग केसीदेखील धून वाजवण्याचा प्रयत्न करते, तेव्हा जॅकीच्या पायाला एका काठीचा मार बसून तो विव्हळतो. ‘टॅलेंट शो’मध्ये कामगिरी वाईट झाल्याने केसी नाराज होते. तिला सर्व जण धीर देतात. शेवटी ते घरी येतात. मग केसीला एका ‘टॅलेंट पूल’ बद्दल माहिती कळते. हा स्विमिंग पूलसारखा एक तलाव असतो. सर्वजण तिथे जातात. या तलावातील पाण्याकडे आपण जी इच्छा मागू, ती पूर्ण होत असते. पण इच्छा पूर्ण करणारे पाणी नाराज असते, कारण त्याच्याकडून मदत घेतल्यानंतर पुन्हा कोणी तिथे फिरकत नसते. केसी या तलावाकडे मैत्रीचा हात पुढे करते. ‘टॅलेंट पूल’ आनंदी होतो आणि केसीला हवे ते मागण्याचे आवाहन करतो. मात्र ती त्यास नकार देते. ‘मी स्वबळावरच कर्तृत्व सिद्ध करीन,’ असे ती सांगते. नंतर ती ‘टॅलेंट शो’मध्ये चांगली कामगिरी करून सर्वांची मने जिंकते. अशा साध्या, पण लहान मुलांना आवडतील अशा गोष्टी ‘ड्रॅगन टेल्स’मध्ये आहेत.





## भांडणारी, पण एकत्रही येणारी भावंडे

या इंग्रजी मालिकेत ‘एमी’ या पात्राला अँड्रिया लिबमनने आवाज दिला होता. ती मॅक्सची मोठी बहीण. ती नेहमी लहान मुलांच्या गटाचे नेतृत्व करते. तिची सर्वांत चांगली मैत्रीण ‘केसी’. एखादा चांगला विचार तिच्या मनात येतो, तेव्हा ती आपले मत या मैत्रिणीकडे मांडते. एमीला खेळण्यात आणि क्रीडा सामने पाहण्याची आवड आहे. ती प्रत्येक ‘टास्क’साठी तयार असते. कधी कधी छोटा मॅक्स तिच्याबरोबर थोडा ईर्षेने वागतो. पण ड्रॅगनलँडवर मात्र दोघे एकत्र येऊन प्रश्न सोडवतात. तिथे एकत्रपणे थरार अनुभवतात. ‘मॅक्स’ या पात्राला इंग्लिशमध्ये डॅनी मॅककिननने आवाज दिला. बहुतेक वेळ मॅक्स एमीबरोबरच असतो आणि काही प्रसंगी दोघांत वितंडवादही होतात. मॅक्स बालीश असल्यामुळे कधी कधी हट्ट पूर्ण करून घेताना तो रागावतो. पण तो धाडसी आहे. ‘ड्रॅगन टेल्स’मध्ये ‘ऑर्ड’ हे एक पात्र आहे. हा आहे निळ्या रंगाचा ड्रॅगन. मॅक्स ड्रॅगनलँडमध्ये या ऑर्डच्या पाठीवर बसून फिरतो. काही वेळा जेव्हा ऑर्ड घाबरतो, तेव्हा मॅक्स त्याला धीर देतो. मॅक्स खरेतर दयाळू वृत्तीचा आहे, पण कधी कधी असमंजसपणाने वागतो. ‘माझ्या वयाचा मुलगासुद्धा धाडस करू शकतो,’ हे त्याला दाखवायचे असते. अशा प्रसंगांत त्याला मदतीची गरज भासते. मॅक्सचे नाव या मालिकेचे कार्यकारी निर्माता जिम कोन यांचा मुलाच्या नावावरून ठेवण्यात आले होते.



## हिरा आणि ग्रॅफाइट

**मित्र-मैत्रिणींनो, तुम्ही अशी काही जुळी भावंडे पाहिली असतील की, जी अगदी एकसारखी दिसतात आणि अशीही काही जुळी भावंडे पाहिली असतील जी एकमेकांपेक्षा खूप वेगळी दिसतात.** आजच्या भागात आपण जाणून घेणार आहोत, त्या जुळ्या भावंडांची नावे आहेत हिरा आणि ग्रॅफाइट. दागिन्यांमध्ये शोभून दिसणारा तेजस्वी हिरा तुम्हांला माहिती असणारच. तसंच, पेन्सिलने तुम्ही कागदावर लिहिता तेव्हा त्यावर उमटणारी काळी अक्षरे म्हणजे खरं तर हिऱ्याचा जुळा भाऊ असलेल्या ग्रॅफाइटचे थर असतात. दोस्तांनो, हे दोघे परस्परविरोधी दिसत असले, तरी ही दोन्ही कार्बन या मुलद्रव्याचीच स्फटिकी अपरूपे (Allotropes) आहेत बरं का ! कार्बन या मूलद्रव्याच्या इतर कार्बन अणूबरोबर संयोग पावण्याच्या उत्तम क्षमतेमुळे कार्बनच्या अणूंपासून वेगवेगळ्या तापमानानुसार आणि दबावानुसार त्याची वेगवेगळी अपरूपे बनतात. त्यांच्यातील कार्बनच्या अणूंच्या मांडणीमुळे त्यांचे गुणधर्म एकमेकांपेक्षा वेगळे असतात. एकमेकांपेक्षा त्यांचे रुप वेगळे आहेच. ग्रॅफाइट गुळगुळीत व ठिसूळ असते, तर हिरा हा जगातला सर्वांत कठीण पदार्थ आहे. तसेच, ग्रॅफाइट विद्युत सुवाहक आहे तर हिरा विद्युत दुर्वाहक! पण दोन्हींमध्ये केवळ शुद्ध कार्बन असल्यामुळे ते दोन्ही जाळल्यावर त्यापासून कार्बन मोनॉक्साइड आणि कार्बन डायऑक्साइड वायूच तयार होतात.

असं का?...

डॉ. दीप्ती सिधये




## पृथ्वीचा दुसरा उपग्रह कोणता?


**मित्र-मैत्रिणींनो, तुम्हाला जर कोणी विचारलं की, आपल्या पृथ्वीला नैसर्गिक उपग्रह किती आहेत? तर तुम्ही चटकन सांगाल एक! तो नैसर्गिक उपग्रह म्हणजे आपला चांदोबा! चंद्र! अगदी बरोबर उत्तर आहे हे, पण तुम्हाला माहित आहे का की, या महिन्यात पृथ्वीला चक्क अजून एक उपग्रह मिळणार आहे!** तो तात्पुरताच असणार आहे, पण म्हणून काय झालं, काही दिवस तरी आपल्याला म्हणता येईल की पृथ्वीला दोन उपग्रह आहेत, हो ना? आता तुम्ही म्हणाल कुठून आला हा दुसरा उपग्रह? नाव काय आहे त्याचं? आणि किती दिवस फिरणार आहे तो पृथ्वीभोवती? बरेच प्रश्न पडलेत ना? देते त्यांची उत्तरं! या उपग्रहाचं म्हणजेच ‘मिनी मून’ चं नाव आहे २०२४ PTS. फक्त दहा मीटर व्यास असलेला हा ‘मिनी मून’ पृथ्वीभोवती २९ सप्टेंबर ते २५ नोव्हेंबर असे ५३ दिवस फिरणार आहे. इतका लहान असल्यामुळे अर्थातच तो आपल्याला उघड्या डोळ्यांनी दिसणार नाही. ५३ दिवस झाल्यानंतर हा ‘मिनी मून’ सौरमालेतील त्याच्या ‘अर्जुन’ नावाच्या लघुग्रहांच्या समूहाकडे परतेल. आहे की नाही ही अवकाशातली गंमत? तुम्हालादेखील अशाच विविध गमती-जमती आवडत असतील, तर तुम्ही अवकाशाचा, खगोलशास्त्राचा थोडा थोडा अभ्यास नक्कीच करा. त्यामुळे तुम्हाला नवी माहिती मिळेल आणि मजाही येईल!


? १) हिरा व ग्रॅफाइट ही कार्बन मूलद्रव्याची काय आहेत?

✔ ५) कुत्रा व मांजर यांच्यात कुत्र्याला प्रशिक्षण देणे सोपे असते.

बेरीज करून मार्ग शोधा. Find way by making addition.














खालील चित्रांमधील दहा फरक शोधा. Find the 10 differences.





# विषय - बुद्धिमत्ता


## घटक - संख्यामाला भाग - 1

## (अपेक्षित प्रश्न संख्या - 8)

शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी

Kishor Borse
विषय - बुद्धिमत्ता






**शिष्यवृत्ती परीक्षेत संख्यामाला या घटकाला खूप महत्व आहे. या घटकावर प्रश्नपत्रिकेत 8 प्रश्न येतात.**

**सर्व प्रश्नाचा अभ्यास करतांना आपल्याला परीक्षेत एक प्रश्न सोडवण्यासाठी साधारणपणे 72 सेकंद कालावधी मिळतो. या घटकावरील प्रश्न अचूक व कमी वेळेत सोडवता येण्यासाठी आपण काय करू शकतो याचा विचार करूया.**

1) 30 पर्यंत पाढे पाठांतर असले पाहिजे.
2) 25 पर्यंत वर्ग, 10 पर्यंत घन लक्षात राहतील अशा प्रकारे नियमित वाचन केले पाहिजे.
3) संख्याचे विविध प्रकार - सम संख्या, विषम संख्या, मूळ संख्या ओळखता आल्या पाहिजे.
4) विभाज्यतेच्या कसोटीचे नियम माहित असावे.
5) गणितातील मूलभूत क्रिया-बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार अधिक वेगाने कसे करता येतील याचा सराव नियमित करता आला पाहिजे.

संख्यामाला या घटकावरील असे विविध नियम, तर्क, निकष असलेल्या उपघटकाचा अभ्यास करू या. या उपघटकांवर आलेल्या प्रश्नाचा अभ्यास करत या प्रश्नामध्ये कोणता नियम, सूत्र, निकष लपलेला आहे तो शोधू या.

### i) संख्याच्या मांडणीतील सूत्र लक्षात घेऊन मालिका पूर्ण करणे

संख्यामालिका या घटकावरील प्रश्न सोडवताना सर्वात महत्वाचे म्हणजे दोन संख्यांमधील फरक शोधणे आवश्यक असते. फरक शोधल्यावर आपल्याला दोन संख्यामधील फरक यामध्ये कोणते सूत्र वापरले आहे ते लक्षात घेऊन आपण संख्यामालिका पूर्ण करता येते. या घटकावरील प्रश्न स्पष्टीकरणासह सोडवू या आणि हा घटक अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेऊ या.

**प्रश्न 1 : 12, 14, 18, 24, 32, 42, ?**
1) 54 2) 44 3) 52 4) 56
**उत्तर :** 1) ● 2) ○ 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेत फरक 2, 4, 6, 8, 10, 12, असा सम संख्याच चढता क्रम आहे.

**प्रश्न 2 : 14, 16, 19, 24, 31, 42, 55, ?**
1) 65 2) 72 3) 75 4) 70
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेत फरक 2, 3, 5, 7, 11, 13, 17 असा मूळ संख्याच चढता क्रम आहे.

**प्रश्न 3 : 14, 19, 29, 40, 44, 52, 59, ?**
1)75 2) 73 3) 67 4) 70
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेत फरक 5, 10, 11, 4, 8, 7 या फरकाचे निरीक्षण केल्यास असे दिसते कि आधीच्या संख्येतील अंकाची बेरीज 1 + 4 = 5, संख्येत मिळवली असता पुढील संख्या मिळते. यानुसार 5 + 9 = 14 हा फरक 59 या संख्येत मिळविला असता आपल्यला 73 उत्तर मिळते.

### ii ) गटात बसणारे पद निवडा

**प्रश्न 1 : 5985, 8541, 6984**
1) 9389 2) 9387 3) 9487 4) 9587
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेचे निरीक्षण केले असता 3 ने नि:शेष भाग जाण्याऱ्या संख्यांचा गट आहे. पर्यायातील 9387 या संख्येस 3 ने नि:शेष भाग जातो.

**प्रश्न 2 : (512, 64), (216, 36), (27, 9)**
1) (1,1) 2) (16, 4) 3) (353, 49) 4) (225, 25)
**उत्तर :** 1) ● 2) ○ 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेचे निरीक्षण केले असता प्रत्येक गटात एक विशिष्ट संख्येचा घन व वर्ग दिलेला आहे उदा. पहिला गट 8 चा घन 512 व 8 चा वर्ग 64 असा आहे. यानुसार पर्याय क्रमांक एक मधील गट योग्य आहे.

### iii ) चुकीचे पद / संख्या ओळखणे

**प्रश्न 1 : 11, 27, 51, 83, 102, 151**
1) 51 2) 27 3) 171 4) 102
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ●
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेचे निरीक्षण केले असता फरक 16, 24, 32, 40, 48 असा अपेक्षित आहे मात्र 83 या संख्येत 40 मिळवले असता 103 हि संख्या येणे अपेक्षित होते. म्हणून पर्याय क्रमांक 4 चुकीचे पद आहे.

**प्रश्न 2 : 3, 11, 27, 57, 123, 251**
1) 123 2) 57 3) 27 4) 11
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेचे निरीक्षण केले असता फरक 8, 16, 32, 64, 128 असा अपेक्षित आहे मात्र 27 या संख्येत 32 मिळवले असता 59 हि संख्या येणे अपेक्षित होते. म्हणून पर्याय क्रमांक 2 चुकीचे पद आहे.

### गटात न बसणारे पद ओळखा

**प्रश्न 1 : (1) 3 (91) 4 , (2) 2 (36) 3, (3) 5 (133) 2, (4) 4 (189) 5**
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – वरील संख्यामालिकेचे निरीक्षण केले असता कंसाबाहेरील डावीकडील व उजवीकडील संख्येचा घन करून यांची बेरीज केली असता कंसातील संख्या मिळते मात्र पर्यायात क्रमांक 2 मध्ये बेरीज 35 येणे अपेक्षित आहे म्हणून पर्याय क्रमांक 2 गटात न बसणारे पद आहे.

### चला आता काही प्रश्न आपण स्वतः सोडवू या. (स्वाध्याय चाचणी)

✧ **दिलेल्या संख्यामध्ये काही साम्य आहे, त्याचा एक गट बनतो. हे साम्य ओळखून त्या गटात बसणारी संख्या पर्यायातून निवडा.**

**प्रश्न 1 : (29, 31), (17, 19), ( 59, 71)**
1) (41,43) 2) (15,17 ) 3) ( 69,71 ) 4) (19,21)
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**प्रश्न 2 : (4, 64), (5, 125), (6, 216)**
1) (8, 514 ) 2) (10, 1000) 3) (15, 225) 4) (6, 218)
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**प्रश्न 3 : $2\frac{1}{4}$, $4\frac{2}{8}$, $3\frac{1}{4}$**
1) $5\frac{4}{16}$ 2) $5\frac{1}{2}$ 3) $6\frac{2}{4}$ 4) $7\frac{1}{8}$
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

✧ **खालील संख्यामालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?**

**प्रश्न 1 : 121, 169, 225, 289, ?**
(1) 334 (2) 400 (3) 246 (4) 361
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

प्रश्न : प्रश्न क्र - 2) 13, 17, 25, 32, 37, ?
(1) 47 (2) 42 (3) 45 (4) 46
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

✧ **गटात न बसणारे पद ओळखा.**

**प्रश्न 1 : (1) 153 (2) 136 (3) 102 (4) 115**
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**प्रश्न 2 : (1) $\frac{4}{10}$ (2) $\frac{10}{32}$ (3) $\frac{8}{22}$ (4) $\frac{6}{16}$**
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

✧ **पुढील संख्यामालिकेतील चुकीचे पद ओळखा.**

**प्रश्न : प्रश्न क्र – 1) 14, 18, 26, 38, 62, 76, 102**
(1) 26 (2) 38 (3) 76 (4) 102
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**प्रश्न 2 : 37, 50, 63, 86, 109**
(1) 86 (2) 37 (3) 63 (4) 109
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

# घटक - इंग्रजी वर्णमाला भाग २

## (भारांश - 12 % अपेक्षित प्रश्न संख्या - 6)

शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी

Kishor Borse
विषय - बुद्धिमत्ता

i) क्रमवार अक्षरमालिका, ii) विसंगत पद / चुकीचे पद ओळखणे, iii) सहसंबंध, iv) सांकेतिक भाषा

Regular Sequence & Reverse Sequence अल्फाबेट्स चार्टचे नियमित वाचन करणे.

सम, विषम व मूळ, वर्ग संख्या असलेल्या स्थानावर येणारे अल्फाबेट सिरीज / अक्षर मालिका चार्ट नियमित वाचन अपेक्षित आहे

आपण जर नियमितपणे वाचन व लेखन केल्यास आपल्यासमोर असलेल्या प्रश्नांमध्ये कोणते सुत्र, निकष, ट्रिक वापरली आहे हे लक्षात येईल.

**नमस्कार..,**

**सर्व गुणवंत विद्यार्थी, मागील लेखात इंग्रजी अक्षरमाला चार्ट क्रमांक 1 ते चार्ट क्रमांक 8 चा अभ्यास केला. सर्व अक्षरमाला चार्ट चे नियमितपणे वाचन केल्यास, सर्व लेटरचे अनुक्रमांक लक्षात राहतील. प्रश्न सोडवण्याचा सराव अधिक महत्वाचा आहे. या लेखात आपण अधिक प्रश्न सोडवण्याचा सराव करणार आहोत.**

इंग्रजी अक्षरमाला या घटकावरील असे विविध नियम, तर्क, निकष असलेल्या उपघटकाचा अभ्यास करू या. या उपघटकांवर आलेल्या प्रश्नाचा अभ्यास करत या प्रश्नामध्ये कोणता नियम, सूत्र, निकष लपलेला आहे तो शोधू या.

### 1) अक्षरमालिका पूर्ण करा.

**1) खालील पदांच्या मालिकेतील क्रम लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या जागी येणारे पद पर्यायातून निवडा.**

**प्रश्न 1)** BC, CF, EI, GL, KO, ? QU.
(1) MS (2) NR (3) MR (4) OR
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ● 4) ○
**स्पष्टीकरण** – गटातील पहिले लेटर अनुक्रमांक २, ३, ५, ७, ११, १३, १७ असा मूळ संख्याचा क्रम आहे व दुसरे लेटर अनुक्रमांक ३, ६, ९, १२, १५, १८, २१ असा चढता क्रम आहे. म्हणून पर्याय क्रमांक १ योग्य उत्तर आहे.

**प्रश्न 2) BC, EG, HK, KO, NS, ?**
(1) NR (2) QK (3) EG (4) QW
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ●
**स्पष्टीकरण** – गटातील पहिले लेटर अनुक्रमांक २, ५, ८, ११, १४, १७ असा चढता क्रम आहे व दुसरे लेटर अनुक्रमांक ३, ७, ११, १५, १९, २३ असा चढता क्रम आहे. म्हणून पर्याय क्रमांक ४ योग्य उत्तर आहे.

**प्रश्न 3) YXW, XVT, WSP, VOK, ?**
(1) UJE (2) UJF (3) YKE (4) XKE
**उत्तर :** 1) ● 2) ○ 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – गटातील पहिले लेटर अनुक्रमांक २५,२४, २३, २२, २१ ( -१_ ) असा उतरता क्रम आहे व दुसरे लेटर अनुक्रमांक २४, २२, १९, १५, १० (-२, -३, -४, -५,) असा उतरता क्रम आहे. तिसरे लेटर अनुक्रमांक २३, २०, १६, ११, ५ (-३, -४, -५, -६) असा उतरता क्रम आहे. म्हणून पर्याय क्रमांक १ योग्य उत्तर आहे.

**प्रश्न 4) Y, A, V, D, ?, I, J, P, A, Y**
(1) I (2) D (3) Q (4) P
उत्तर : 1) ● 2) ○ 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – विषम स्थानावरील लेटर अनुक्रमांक उलट क्रमाने दिल्यास १, ४, ९, १६, २५ (+ ३, + ५ + ७, + ९) असा चढता क्रम आहे व सम स्थानावरील लेटर अनुक्रमांक रेग्युलर क्रमानुसार १, ४, ९, १६, २५ (+ ३, + ५ + ७, + ९) असा चढता क्रम आहे. म्हणून पर्याय क्रमांक १ योग्य उत्तर आहे.

### 2) पुढील मालिकेतील चुकीचे पद ओळखा?

**प्रश्न 1) ACBD, EGFH, IKJL, MONP, PQRS**
(1) PQRS (2) ACBD (3) EGFH (4) MONP
**उत्तर :** 1) ● 2) ○ 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – पर्याय क्रमांक १ चुकीचे पद आहे. PQRS या गटातील लेटर्सचे अनुक्रमांक क्रमाने आलेली आहेत. (उदा. PQRS -, १६, १७, १८, १९ ) मात्र इतर सर्व पर्यायात दुसऱ्या व तिसऱ्या लेटरचा अनुक्रमांक क्रम बदल झालेला आहे. (उदा. ACBD - १, ३, २, ४)

### ३) सहसंबंध

**प्रश्न 1) पहिल्या दोन पदांचा सहसंबंध लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा पर्याय निवडा:**

$\frac{J}{E} : \frac{T}{J} : : \frac{L}{F} : ?$ (दोन अचूक पर्याय निवडा)

(1) $\frac{R}{F}$ (2) $\frac{X}{L}$ (3) $\frac{N}{G}$ (4) $\frac{X}{M}$
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ● 4) ○
**स्पष्टीकरण** – पहिल्या दोन पदांच्या लेटर्सला अनुक्रमांक दिले असता छेदाने अंशास पूर्ण भाग जातो व अंश स्थानी असलेल्या लेटरचा अनुक्रमांक हा छेद स्थानी असलेल्या लेटरच्या अनुक्रमांकाच्या दुप्पट आहे.

उदा. $\frac{१०}{५} : \frac{२०}{१०} : : \frac{१२}{६}$ : यानुसार पर्याय क्रमांक २ व पर्याय क्रमांक ३ या दोन्ही पर्यायात वरील सहसंबंध दिसून येतो.

**प्रश्न 2) MOQ : PRU : : ? : NPS**
1) UWY (2) KMO (3) JHF (4) JLP
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – पहिल्या दोन पदांच्या लेटर्सला अनुक्रमांक दिले असता १३, १५, १७ : १६, १८, २१, हा क्रम लक्षात घेता असे दिसते (+३, +३, + ४) असा दिसत आहे. यानुसार पर्याय क्रमांक २ मध्ये वरील सहसंबंध दिसून येतो.

**प्रश्न 3) ADJ : BFM : : CIO : ?**
(1) DKR (2) ELR (3) DKQ (4) DJP
**उत्तर :** 1) ● 2) ○ 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – पहिल्या दोन पदांच्या लेटर्सला अनुक्रमांक दिले असता १, ४, १० : २, ६, १३ हा क्रम लक्षात घेता असे दिसते (+१, +२, + ३) असा दिसत आहे. यानुसार पर्याय क्रमांक १ मध्ये वरील सहसंबंध दिसून येतो.

**प्रश्न क्र. 4) WVU : N : : TSR : ?**
(1) F (2) H (3) C (4) E
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ●
**स्पष्टीकरण** – पहिल्या दोन पदांमधील पहिल्या गटातील लेटर्सला उलट क्रमाने अनुक्रमांक दिले असता ३, ४, ५ असे येतात व त्या अनुक्रमांकाची बेरीज १२ येते. रेग्युलर क्रमानुसार १२ अनुक्रमांक असलेले लेटर N येते. हा सहसंबंध लक्षात घेता असे दिसते यानुसार पर्याय क्रमांक ४ उत्तर योग्य आहे.

### 4) गटात न बसणारे पद पर्यायांतून निवडा.

**प्रश्न 1) 1) AU (2) IM (3) GO (4) EP**
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – सर्व गटातील लेटर्सला अनुक्रमांक देऊन बेरीज केली असता AU - १ + २१ = २२, IM - ९ + १३ = २२, GO - ७ + १५ = २२, EP - ५ + १६ = २१ पहिल्या तीन पर्यायाची बेरीज २२ येते मात्र पर्याय क्रमांक ४ ची बेरीज २१ येते म्हणून पर्याय क्रमांक ४ गटात न बसणारे पद आहे.

**प्रश्न 2) 1) CO (2) BX (3) DL (4) FH**
**उत्तर :** 1) ● 2) ○ 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – सर्व गटातील लेटर्सला अनुक्रमांक देऊन गुणाकार केला असता CO - ३ × १५ = ४५, BX २ × २४ = ४८, DL - ४ × १२ = ४८, FH - ६ × ८ = ४८ पर्याय क्रमांक १ वगळता सर्व पर्यायांचा गुणाकार ४८ आहे. म्हणून पर्याय क्रमांक १ गटात न बसणारे पद आहे.

**प्रश्न 3) 1) ADH (2) RVY (3) KNR (4) FIM**
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – सर्व गटातील लेटर्सला अनुक्रमांक दिले असता १) ADH - १, ४,८ (2) RVY - १८,२२,२५ (3) KNR - ११, १४ १८ (4) FIM - ६, ९, १३ पर्याय क्रमांक २ वगळता सर्व पर्यायांचा क्रम +३ +४ असा आहे म्हणून पर्याय क्रमांक २ गटात न बसणारे पद आहे.

**प्रश्न 4) 1) CH (2) EJ (3) LB (4) FD**
**उत्तर :** 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○
**स्पष्टीकरण** – सर्व गटातील लेटर्सला अनुक्रमांक देऊन गुणाकार केला असता CH - ३ × ८ = २४, EJ ५ × १० = ५०, LB - १२ × २ = २४, FD - ६ × ४ = २४ पर्याय क्रमांक २ वगळता सर्व पर्यायांचा गुणाकार २४ आहे. म्हणून पर्याय क्रमांक १ गटात न बसणारे पद आहे.

### ५) सांकेतिक भाषा.

या घटकात दोन प्रकारचे प्रश्न असतात, या लेखात आपण अक्षरमालेशी संबंधित सांकेतिक भाषेचे प्रश्न सोडवू या.

**प्रश्न 1) एका सांकेतिक भाषेत LOAD हा शब्द 121514 व GOAT हा शब्द 715120. असा लिहितात तर त्याच सांकेतिक भाषेत 'MAKE' हा शब्द कसा लिहाल?**
(1) 135111 (2) 513111 (3) 131511 (4) 131115
**उत्तर :** 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ●
**स्पष्टीकरण** – प्रश्नातील शब्दांच्या लेटर्सचे रेग्युलर क्रमानुसार अनुक्रमांक दिले असता सांकेतिक कोड तयार होतो. L - 12, O - 15, A- 1, D- 4 त्यानुसार MAKE या शब्दातील सर्व लेटर्स रेग्युलर क्रमानुसार अनुक्रमांक दिले असता M- 13, A -1, K- 11, E - 5 म्हणून पर्याय क्रमांक ४ हा योग्य पर्याय आहे.

**(पुढील लेखात सांकेतिक भाषा या घटकावरील प्रश्न सोडवू या.)**

• Registered • Date of Publication : शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



# अष्टपैलू

भारताचा फिरकी गोलंदाज आर. अश्विनने भारत-बांगलादेश कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात चमकदार कामगिरी केली आहे. चेन्नई (चेपॉक स्टेडियम) येथे झालेला हा सामना भारताने २८० धावांनी जिंकला. कुशल गोलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू असलेल्या अश्विनने या सामन्यात शतक तर झळकावलेच, पण गोलंदाजी करताना ६ बळीही (विकेट्स) मिळवले. यांसह त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण ७५० बळी घेण्याचा टप्पा पार केला.

**आर. अश्विन** (रविचंद्रन अश्विन) • **जन्म** : १७ सप्टेंबर १९८६, चेन्नई • **वय** : ३८ वर्षे



### कसोटी

| | |
|---|---|
| सामने | : १०१ |
| धावा | : ३४२२ |
| शतके | : ६ |
| अर्धशतके | : १४ |
| चौकार | : ३९२ |
| षट्कार | : २३ |
| झेल | : ३३ |

### एकदिवसीय

| | |
|---|---|
| सामने | : ११६ |
| धावा | : ७०७ |
| अर्धशतके | : १ |
| चौकार | : ६० |
| षट्कार | : ७ |
| झेल | : ३० |

### टी-२०

| | |
|---|---|
| सामने | : ६५ |
| धावा | : १८४ |
| चौकार | : १७ |
| षट्कार | : ४ |
| झेल | : ११ |

### आयपीएल

| | |
|---|---|
| सामने | : २१२ |
| धावा | : ८०० |
| अर्धशतके | : १ |
| चौकार | : ६१ |
| षट्कार | : २८ |

'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप'मध्ये (डब्ल्यूटीसी) एकाच सामन्यात ५ किंवा त्याहून अधिक बळी घेण्याची अश्विनची ११ वी वेळ.

'आयसीसी'च्या गोलंदाजांच्या कसोटी सामन्यांच्या यादीत प्रथम क्रमांक.

## 'फाइव्ह विकेट हॉल'

अश्विनने आतापर्यंत कसोटी सामन्यांत ३७ वेळा भारतासाठी एकाच सामन्यात ५ किंवा त्याहून जास्त बळी घेतले आहेत. याला 'फाइव्ह विकेट हॉल' किंवा 'फायफर' म्हणतात. आताच्या भारत-बांगलादेश कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यासह अश्विनने याबाबतीत ऑस्ट्रेलियाचा दिवंगत खेळाडू शेन वॉर्नच्या विक्रमाशी बरोबरी केली.

कसोटी क्रिकेटमध्ये आतापर्यंत सर्वाधिक - म्हणजे ६७ 'फाइव्ह विकेट हॉल' नोंदवण्याचा विक्रम श्रीलंकेच्या मुथ्थय्या मुरलीधरनच्या नावावर आहे, तर आर. अश्विन आणि शेन वॉर्न दुसऱ्या क्रमांकावर आहेत. 'डब्ल्यूटीसी'मध्ये आर. अश्विन ११ वेळा ५ किंवा अधिक विकेट्स घेऊन पहिल्या स्थानावर, तर ऑस्ट्रेलियाचा नेथन लियॉन दुसऱ्या स्थानावर आहे.

## कसा झाला प्रवास?

- आर. अश्विनने 'आयपीएल' सामन्यातून २००९ मध्ये व्यावसायिक क्रिकेटच्या क्षेत्रात प्रवेश केला. करिअरच्या सुरुवातीलाच 'आयपीएल' आणि 'टी-२०'मध्ये त्याची खेळातील चमक दिसली.
- २०११ मध्ये वेस्ट इंडीजविरुद्ध त्याने पहिला कसोटी सामना खेळला. मैदानावरील उत्तम निर्णयक्षमता आणि गोलंदाजीतील अचूकता यांच्या जोरावर अश्विनचे नाव देशातील उत्कृष्ट गोलंदाजांमध्ये गणले जाऊ लागले.
- सामना आपल्या बाजूने वळवणारा गोलंदाज म्हणून त्याच्या नावाची चर्चा होऊ लागली. त्यामुळेच आजही अनेक तयारीचे फलंदाजही त्याच्या 'फिरकी'च्या चक्रव्यूहात अडकतातच!

### बळी

५२२ कसोटी

१५६ एकदिवसीय

७२ टी-२०

१८० आयपीएल

'ऑलराउंडर' खेळाडूंच्या कसोटी यादीत दुसऱ्या क्रमांकावर.

कसोटी सामन्यातील 'मॅन ऑफ द सीरिज' हा सन्मान १० वेळा पटकावणारा पहिला भारतीय खेळाडू.

भारत सरकारच्या 'अर्जुन पुरस्कारा'ने सन्मानित.